

# सौंदर्य

लेखक:प्रतिकविजय उकले

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# सौंदर्या

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

कथासंग्रह

# सौंदर्या

लेखक : प्रतिक विजय उकले

# सौंदर्या

## लेखक : प्रतिक विजय उकले

गुरूकन्नन नगर लिंबू चौक, इचलकरंजी.

तालुका – हातकणंगले, जिल्हा - कोल्हापुर

मोबाईल : 8624872409

ई मेल : ukalepratik@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १ मे २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



पुस्तकाचे नाव - सौंदर्या

लेखकाचे नाव - प्रतिक विजय उकले

पत्ता - गुरूकन्नन नगर लिंबू चौक, इचलकरंजी.

तालुका - हातकणंगले

जिल्हा - कोल्हापुर

मो.नं - 8624872409

Email id - ukalepratik@gmail.com

## अर्पण पत्रिका



**माझे पहिल ई-पुस्तक (कथासंग्रह)**

**माझे आजोबा कै. विठ्ठल परशुराम उकले (पर्यवेक्षक, रा.छ.शाहू हाय. इचलकरंजी) यांच्या चरणी प्रथम अर्पण करतो.**

## मनोगत

शाळेत शिकत असताना अभ्यासक्रमात असलेली पुस्तके वाचताना खुप कंटाळा यायचा. तेव्हा वाचन करण्यास नकोस वाटायच. अकरावी बारावीचे कॉलेज हे सकाळी असायचे. त्यामुळे दिवसभर मोकळा वेळ असायचा. त्याच वेळेमध्ये मी अनेक गोष्टींची पुस्तके वाचण्यास सुरवात केली. अनेक सोशल मीडियामध्ये येणारे लेख, कविता आणि कथा वाचू लागलो. जसे जसे माझे वाचन वाढू लागले, तसे तसे मी काही तरी लिहिण्याचा प्रयत्न करू लागलो. त्यातून कविता, कथा, लेख असे अनेक साहित्य लिहीत गेलो. ते लिहिलेले साहित्य सोशलमिडिया व वृत्तपत्र यासारख्या माध्यमातून प्रसिध्द झाले. त्यावर अनेक वाचकांच्या मला प्रतिक्रिया मिळू लागल्या. या प्रतिक्रियेमुळे मला लिहीण्यास आणखी बळ आले, प्रेरणा मिळाली. आपण काहीतरी वेगळं करू शकतो, लिहू शकतो असा आत्मविश्वास माझ्यामध्ये निर्माण झाला. पुढे हाच आत्मविश्वास मनात बाळगून लिखाण चालू ठेवलो. लिहिणे व वाचन करणे चालू असतानाच मध्येच मी काही कारणास्तव लेखनापासून दुरावलो. पण पुढे कोरोना व्हायरस सारख्या महारोगामुळे संपूर्ण देश लॉकडाऊन झाला. त्या कालावधीमध्ये मला सोशलमिडियावर अनेक लेखक मंडळी

भेटले. त्यात नासा येवतीकर सरांसारखे मला मार्गदर्शक भेटले. सरांनी मला साहित्य सेवक समूहात सहभागी करून घेतले. त्या समूहामध्ये सरानी दररोज कथा, कविता, लेख यासारखे पन्नास दिवसाचा हा उपक्रम राबविले होते. या उपक्रमामुळे माझ्यासारख्या अनेक लेखकाना दररोज काहितरी लिहीण्याची सवय लागली. यामुळे मी दररोज कथा, कविता लिहीत गेलो. हीच सवय माझ्या अंगी कायम राहिली. यातुनच माझ्या 'सौंदर्या' या पहिल्या कथासंग्रहाचा जन्म झाला. माझ्या सौंदर्या या कथासंग्रहाला प्रसिद्ध स्तंभलेखक नासा येवतीकर सरांनी प्रस्तावना लिहीली असून, पुस्तकातील कथा व त्यातील पात्रांची खुप छानपणे ओळख करून दिलेली आहे. हा कथासंग्रह प्रकाशित करीत असताना धर्माबादचे लेखक नासा येवतीकर सर, जालना येथील गणेश साळुंखे सर, मित्र व नातेवाईक या सर्वांची मला खुप मदत मिळाली.

"सौदर्या" हा कथासंग्रह तुम्हा वाचकांना नक्की आवडेल याची मला पुर्ण पणे खात्री आहे. तुम्ही सर्व वाचक मंडळी नक्की वाचाल व त्यावर प्रतिक्रिया ही द्याल, असा विश्वास तुमच्यावर ठेऊन मी माझे मनोगत थांबवतो.

**- प्रतिक विजय उकले, इचलकरंजी**

# प्रस्तावना

# जीवनातील सत्य बाबीवर प्रकाश टाकणारे

# सौंदर्या कथासंग्रह

इचलकरंजी म्हटले की कपड्यासाठी प्रसिद्ध असलेले गाव म्हणून ओळख मिळते. अश्याच या इचलकरंजी गावात आपले वाणिज्य शाखेतील पदवीचे शिक्षण नुकतेच पूर्ण केलेला प्रतिक विजय उकले नावाचा एक युवक साहित्य क्षेत्रात पाऊल टाकण्यासाठी धडपड करतो. बारावीपासून त्याला वाचनाची व लेखनाची आवड होती. सवड असली की आवड निर्माण होतेच होते. सोशल मीडियाच्या माध्यमातून असे अनेक युवा मंडळी साहित्याच्या क्षेत्रात पदार्पण करत आहेत, ही खरोखरच आनंदाची बाब आहे. प्रतिक देखील गेल्या वर्षी साहित्य सेवक समुहात दाखल झाला. या समुहात लॉकडाऊनचा काळ घरात बसून कंटाळून जाऊ नये म्हणून रोज एक लेख लिहिण्याचा उपक्रम पन्नास दिवस चालविले. त्यानंतर रोज एक कथा लिहिण्याचा व वाचण्याचा उपक्रम देखील घेण्यात आला. त्यात प्रतिकने उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत आपली लेखन कला विकसित केली.

याच लॉकडाऊनच्या काळाचा फायदा कथा लेखनात घालवून अवघ्या एक दोन वर्षात साहित्याच्या क्षेत्रात कथा लेखक म्हणून दमदार पाऊल टाकत असल्याबद्दल प्रतिकचे प्रथमतः मनःपूर्वक अभिनंदन करावेसे वाटते.

प्रतिक उकले यांचा सौंदर्या नावाचा कथासंग्रह वाचकांच्या समोर येत आहे. त्यांचा हा पहिला वहिला कथासंग्रह आहे. त्यामुळे या संग्रहात लेखकाकडून फार मोठी अपेक्षा निश्चित नाही. पण कथा वाचतांना वाचक देहभान हरपून कथा वाचेल हे मी खात्रीपूर्वक सांगू शकतो. कारण त्यांनी या संग्रहात तसे खूप छान विषय, ज्वलंत प्रश्नावरील कथानक आणि काही कथेतून मार्गदर्शन देखील मिळते. सध्या कोरोना व्हायरसमुळे सर्वत्र लॉकडाऊन आहे. त्याच धर्तीवर शेजारची काकू ही पहिली कथा वाचकांना अंतर्मुख करायला लावते. कथेचा नायक आपल्या दोन भाऊ आणि दोन बहिणीला शेजारच्या काकूच्या मदतीने कसा मोठा करतो ? काकूंचे मुलं असून देखील नसल्यासारखे वागतात. समाजातल्या काही गोष्टीवर लेखक कथेतून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो. दारूवर आजपर्यंत अनेकांनी कथा लिहिल्या आहेत आणि यापुढे देखील लिहिल्या जातील. प्रत्येकांचे सांगणे एकच ते म्हणजे दारू पिणे हे संसाराच्या प्रगतीसाठी वाईट असते. घरातील लहान मुलांवर वाईट

संस्कार होतात. दारूमुक्त माझं गाव या कथेत प्रशांत हा शाळेत जाणारा विद्यार्थी गाव दारूबंदी करण्यासाठी कसा प्रयत्न करतो हे वाचण्यासारखे आहे. बालपणीची मैत्रीण जर दुःखात आणि अत्यंत कष्टात दिसली तर बालपणीच्या मित्राचा जीव तीळ तीळ तुटतो. तिला काहीतरी मदत करावे अशी भावना मनात निर्माण होते अशीच शर्मिलाचा संसार या कथेत दिसून येते. त्याचसोबत वयात न आलेल्या मुलीचे बालपणी विवाह लावल्याने काही नुकसान होते हे ही या कथेतून वाचण्यास मिळेल. मित्राने केलेल्या मदतीमुळे शर्मिलाचा संसार कसा फुलतो हे ही वाचण्यासारखे आहे. गरिबीमुळे माणूस शिक्षण घेतो. संत बहिणाबाई यांनी म्हटले आहे की, आधी हाताला चुटका, मग मिळते भाकर. तर समर्थ रामदास स्वामी म्हणतात आधी कष्ट मग फळ, कष्टेविना सर्व निष्फळ. दहा रुपयांचा मोबदला ह्या कथेत अत्यंत गरीब घरातील सतीशची कहाणी सांगितली आहे. तो जिल्हाधिकारी होतो पण दहा रुपयांची नोट मात्र नेहमी जवळ का ठेवतो याचे सुंदर कथानक केले आहे.

पुस्तकाचे शीर्षक असलेली कथा म्हणजे सौंदर्या. नकोशी असलेली मुलगी कचऱ्याच्या डब्यातून झोपडपट्टी मध्ये मोठी होते आणि नशिबाने चित्रपटात जाते आणि तेथे तिला कोण कोण भेटतात ? खूप सुंदर वळण घेत लिहिलेली कथा आहे. समाजातील

नकोशी प्रवृत्ती कधी संपते ? नकोशी म्हणून मुलगी टाकून देणाऱ्या आई-बाबांना एक चांगला पाठ यावर भाष्य करणारी कथा आहे. जीवनात मैत्री जेवढी साथ देऊ शकते तेवढं घात देखील करते हे घात मैत्रीचा या कथेत वाचायला मिळेल. श्रीमंत घरातली मुलगी प्रीती व गरीब घरातील रमेश यांचे प्रेम कसे फुलते ? या दोघांच्या मैत्रीचा फायदा त्याचे मित्र संदीप व अक्षय कसे उचलतात याची कहाणी एखाद्या चित्रपटाप्रमाणे वाटायला लागते. घरात दारिद्र्य असेल, गरिबीमुळे हुशार मुले कशी वाया जातात ? याचे उत्तम नमुना दारिद्र्याचा वारसा या कथेत वाचता येईल. शाळेकरी मित्र योगेश याचे शालेय जीवनातील अनेक बावळट किस्से पुढील कथेत बावळट योग्या मध्ये मिळेल. असे मित्र नेहमी इतरांना सुखी व आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करतात. म्हणून लेखक शेवटी हे सांगायला विसरत नाहीत की योग्या सारखे मित्र असायलाच हवे. प्रत्येकांना मुंबईचे आकर्षण असते. जीवनात एकदा तरी मुंबई पहावी असे वाटते. तर काही युवकांना मुंबईची चंदेरी दुनिया खुणावत असते. याच लोभापायी काही युवक आपले घरदार सोडून मुंबईत येतात पण त्यांची येथे फसवणूक कशी होते याची माहिती अनोळखी मुंबई या कथेतून देण्याचा प्रयत्न खूप सुंदर आहे. या कथासंग्रहातील शेवटची कथा म्हणजे पक्याचं लफडं. शीर्षक

वाचून वाचकांच्या मनात अनेक तर्कवितर्क चालू होतात. कथा वाचतांना पक्याचं पुढं काय होईल असेच वाटत राहते.

लेखकामध्ये कथाशैली लिहिण्याचे कसब असून त्यांनी अजून वाचनावर भर द्यावे. त्याचसोबत एखादी कादंबरी लिहिण्याचा प्रयास देखील करावा असे सुचवावे वाटते. त्यांच्या पुढील लेखन समृद्धी होत राहो हीच सदिच्छा ...!

**- नासा येवतीकर, स्तंभलेखक, धर्माबाद**

**जि.नांदेड9423625769**

सदर पुस्तकातील कथा या पूर्णपणे काल्पनिक आहेत. त्यांचा वास्तविक व्यक्ती, स्थळे व घटना यांच्याशी काहीही संबंध नाही. असा संबंध कोठेही आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# अनुक्रमणिका


१. शेजारची काकू

२. दारूमुक्त माझं गाव

३. शर्मिलाचा संसार

४. दहा रुपयाचा मोबदला

५. सौंदर्या

६. घात मैत्रीचा

७. दारिद्र्याचा वारसा

८. बावळट योग्या

९. अनोळखी मुंबई

१०. पक्याचं लफडं

# शेजारची काकू

कोरोना सारख्या महारोगामुळे संपूर्ण देश लॉकडाऊन असताना. मी पहिल्यांदाच घरात इतका वेळ थांबलो होतो. लॉकडाऊनमूळे बाहेर पडणे ही मुश्किल झाल होत. हिरवी कामाच्या व्यापामुळे वेळ कसा जायायचा ते कळत नव्हत. पण आज वेळ जाता जात नव्हता. त्यामुळे मी माझ्या रुम मध्ये जाऊन, दरवाजा पूढे ढकलून एकटाच शांत खोलीत बसलो. अचानक सगळ वातावर शांत असल्याने, मला माझ बालपण आठवल. मी आणि माझे दोन भाऊ आणि दोन बहिणी व वडील असा आमचा परिवार. मी सगळयात थोरला व माझी दोन नंबरची बहीण म्हणजेच कमल आणि तिच्या खालोखाल दोन भाऊ राम व श्याम आणि सगळयात धाकटी बहीण म्हणजेच सरस्वती. सरस्वती जेव्हा जन्मली त्याच दिवशी आम्हची आई आम्हा सगळयांना पोरख करून निघून गेली. आमचे बाबा शेतकरी असल्याने, पहाटे चार वाजता शेतात जायायचे. ते अकरा वाजता घरी आल्यावर आमच्यासाठी जेवण करायचे. मला म्हणायचे, तुम्ही सगळीजण जेवून घ्या. अस सांगून ते माझ्यावर सगळया भांवडाची जबाबदारी

टाकून शेतात परत जायायचे. कमलला थोड समजत होत, पण दोन भावासनी आणि सरस्वतीला चारवाव लागत होत. वडील दररोज सकाळी गेल्यावर मला सगळयांना उठवून अंघोळ घालून, त्यांच मेकप-पौंडर करून त्यांना शाळेत सोडायच. मग मी माझ आवरुन शाळेत जायायचो. पुढे जस-जसे आम्ही मोठे होत गेलो, तसे कमल व राम-श्याम स्वतःची कामे स्वतः करू लागले. आता फक्त सरस्वतीलाच आवरावे लागत होत.

पुढे आम्ही एकेक वर्ग जसे पुढे जात होतो, तसा प्रत्येकांवर अभ्यासाचा ताण वाढत होता. नतंर सगळयांचा अभ्यास देखील सुरळीत चालू झाला. मी दहावीला असतानाच आम्हच्या घरावर काळांन घात केला. आम्हचे वडील आम्हा सर्वांना सोडून, या जगातुन निघुन गेले. तेव्हा कमल नवीला व राम-श्याम सातवी व आठवीला होते. तर छोटी सरस्वती देखील इयत्ता चौथी मध्ये शिकत होती. आता या सगळयाची व त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी माझ्यावर येऊन पडली. तेव्हा मी ठरवल होत, शेती करायची पण आम्हची शेती सावकाराकडे गघांण होती. त्यामुळे मी दुसऱ्याच्या शेतात कामाला जाऊ लागलो. दहावी असल्याने शेतातुन आल्यावर अभ्यास करायचो. कमल ही मोठी झाल्याने ती घरची सर्व कामे करून, तिही माझ्याबरोबर अभ्यासाला बसायची.

एक दिवशी माझी छोटी बहिण सरस्वतीला रात्रीचा अचानक ताप आला. तिने डोळे पांधरे केले होते. आम्हाला काहीच समजत नव्हत. तेव्हा श्यामने शेजारी असलेल्या काकूना बोलवून आणल. त्या काकूनी सरस्वतीच्या डोक्यावर गारपाण्याच्या पट्टया ठेवल्या व रात्रभर त्या सरस्वती जवळच थांबल्या. आमच्या शेजारी राहणाऱ्या या काकू जास्त कुणाबरोबर बोलत नसत. त्यांच्या घरात काकू व त्यांचा म्हातारा नवरा दोघेच राहायचे. त्यांना एक मुलगी व एक मुलगा आहे. पण त्या दोघाणीही आपापल्या मर्जीने लग्न केल्याने ते आईवडीलाना बघत नसत. त्यामुळे हे दोघे काही महिन्यापुर्वी आम्हच्या शेजारी भाड्याने राहण्यास आले होते. आज त्या काकू स्वत:च्या मुलीप्रमाणे सरस्वतीची काळजी घेतली. सरस्वतीचा ताप उतरला. पुढे त्या काकू आम्हच्यात मिळुन मिसळून वागु व बोलू लागल्या. सरस्वतीचा तर त्या काकूंवर जीवच चढला होता. त्यामुळे सरस्वती आम्हच्यात कमी व काकूंच्या घरीच जास्त असायची. सरस्वतीच्या नादाने कमल व राम-श्याम देखील काकू जवळ असायचीत. पुढे काकूनी कमला सगळा स्वयपाक शिकवला. एक मुलगी म्हणुन कस वागायच व जगायच त्याच योग्य संस्कार ही काकूंनी कमला दिल. या काकुंमुळे आम्हा बहिण-भावंडाणा आईची माया मिळाली. माझा दहावीचा पेपर जवळ येत असल्याने मला अभ्यासाकडे लक्ष द्यायच होत.

तेव्हा या काकुनी सांगितल, तुझे पेपर होऊस पर्यंत तुम्हच्या सगळयांच्या जेवणाची जबाबदारी माझी. कमल मला स्वंयपाक करण्यासाठी मदत करेल. तर सरस्वतीलाही शाळेत आवरून पाठवण्याची ही जबाबदारी माझी. तू आता फक्त अभ्यास करायच. माझा अभ्यासही जोराने सुरू झाला. काही दिवसानी पेपर सुरू होऊन कधी संपले ते कळलेच नाही. पुढे काही दिवसातच निकाल ही जाहिर झाला. तेव्हा माझा स्वत:वरच विश्वास बसला नव्हता. कारण मी तालुक्यातुन पहिला आलो होतो. मी आई-वडिलांच्या फोटोला पाया पडून, काकूंचा आशिर्वाद घेतला. तेव्हा त्या रात्री काकूने मला विचारल, बाळ आता पुढच शिक्षण कुठे घेणार. कारण तुला शिकूण खुप मोठ होऊन, तुला तुझ्या दोन्ही बहिणीच लग्न करायच आहे. त्यासाठी तुला पुढे शिकावच लागेल. तेव्हा मी काकूला म्हणालो, काकू बास झाल शिक्षण माझ. लंग्नतर करायच आहे बहिणीच, त्यासाठी मी शेतात खुप कष्ट करून पैसा गोळा करीन. हा काकू मी जर शिकायच म्हणल तर मला शहरात जाव लागणार. मग इकडे बहिण भावाच कस होणार. तेव्हा काकू म्हणते, तु आयुष्यभर शेतातच राबणार आहेस का? हा मग राहिला तुझ्या बहिण-भावाचा प्रश्न, अरे त्याच्यासाठी मी आहे की, तु कशाला काळजी करतोस. तु आणि तुझी भावंडे मला मुलाप्रमाणे आहेत. तु शिकाव अशी माझी खुप इच्छा आहे. तू तुझ्या आईच स्वप्न पुर्ण

नाही करणार का? अस काकू म्हणताच, मी काकूंना मिठी मारली. काकूच्या रूपाने मला माझी आईच भेटली होती. काकूने माझ्या डोळयातुन आलेले अश्रु हाताने पुसले. दुसऱ्या दिवशीं मी शहरातल्या मोठ्या कॉलेज मध्ये ॲडमिशन घेतल. तालुक्यातून पहिला आलेलो असल्याने. माझ्या पुढील शिक्षणाची सगळी जबाबदारी माझ्या शाळेन उचलली होती. त्यामुळे मला शहरामध्ये चांगल जेवण व राहण्याची सोय ही उत्तम होती. त्यामुळे माझा अभ्यास देखील चांगला व्हायचा. तिकडे काकू माझ्या भावंडाची काळजी घेत असल्याने माझी तिकडची काळजीच मिटली होती. पुढे माझ शिक्षण पुर्ण झाल्यावर, मला मुंबईतल्या एका मोठ्या कंपनीमध्ये चांगल्या पदाची नोकरी लागली. इकडे कमल ही शिकली असल्याने, तिला देखील एल.आय.सी. ऑफिस मध्ये नोकरी लागली. राम-श्याम ही अजुन शिकत होते. तर माझी सर्वात धाकटी बहिण व काकूची लाडकी सरस्वतीने मात्र नवीमध्ये असतानाच, शिक्षणाला रामराम केला. पुढे पाच सहा वर्षाच्या कालावधी मध्ये काकूंनी माझ, कमलच व राम-श्यामच स्वतः च्या मुलांन प्रमाणे आम्हच लग्न लावून दिल. पुढे काकूनी सरस्वतीच ही लग्न ठरवल. त्या लग्नाच्या कालावधी मध्ये काकूचे पती महादेव काका देवाघरी निघून गेले. वडिलाना निरोप देण्यासाठी त्यांची दोन्ही मुले आलीत. पण अंत्यविधी झाल्यावर, ते काकूना

त्यांच्याबरोबर घेऊन न जाता गेले. त्याच काकूना खुप वाईट वाटत होत. आता आम्ही सगळ्या भावंडांनी ठरवल की, "ज्या वेळी आम्हाला आईच्या मायेची गरज होती, तेव्हा या काकूने आम्हाला आईची माया दिली. आता या काकुला म्हातारपणी मुलांच्या आधाराची गरज आहे, तर आता आपण या काकू आईला शेवटपर्यत सांभाळायच." तेव्हा पासुन काकू आम्हच्या जवळच राहु लागल्या. थोड्या दिवसानी दुखातुन सावरल्यावर सरस्वतीच लग्न देखील झाल. तेव्हा सरस्वतीने काकुजवळ हट्टच धरला होता की, तु माझ्याबरोबर माझ्या सासरी येऊन राहायच. सरस्वतीचा झालेला नवरा देखील एक अनाथ मुलगा होता. त्याने स्वतः कमवून शिकून एक मोठा अधिकारी झाला होता. त्यामुळे त्याला देखील आईच्या मायेची गरज होती. त्याने देखील काकुंकडे हट्ट केला, त्यांच्याच्या बरोबर येण्याचा. तेव्हा ना ई-लाजाजाने काकुला, सरस्वती बरोबर तिच्या सासरी राहण्यास जावाव लागल. आता सगळी भांवंडे व काकू सुखात होती. पुढे काही वर्षोनी काकू आजारी पडू लागल्या. तेव्हा आम्ही सर्व भांवडे सरस्वतीच्या घरी एकत्र जमलो होतो. तेव्हा आम्हा सर्वाना एकत्र पाहुन काकुनी आम्हाला जवळ घेतल आणि तेव्हा अचानक कुणाच्या ही न कळत, माझ्या लाडक्या काकूनी या जगाचा निरोप घेतला.

पप्पा, ओ पप्पा...! अशी हाक माझ्या कानी आली. तेव्हा मी माझ्या भुतकाळातुन बाहेर आलो. तेव्हा माझ्या लाडक्या काकूची आठवण खुप येत होती. माझ्या डोळ्यातुन पाणी तपाटप खाली पडत होत. माझ्या मुलीने मला प्रश्न विचारला, पप्पा तुम्ही का रडत आहात. तेव्हा मी म्हणालो, अरे बाळ मी या बंद खोलीत बसुन, मी माझ्या आयुष्यात घडून गेलेला भुतकाळ उघडून पाहत होतो. तेव्हा मला माझ्या शेजारी राहणाऱ्या काकूंची खुप आठवण आली. बाळ, आज फक्त आणि फक्त त्या काकुमुळेच मी, तुझे दोन काका आणि दोन आत्या आज या जगासमोर ताठ मानेने उभे आहोत.

# दारूमुक्त माझं गाव

कोल्हापूर जवळ असलेल्या छोट्याश्या गावातला प्रशांत हा मुलगा. प्रशांतचे कुटूंब चार वर्षापूर्वी मुंबईहून या छोट्याश्या गावामध्ये स्थलांतर झाले होते. गाव छोट व खेडकर असल्याने प्रशांतला त्या गावात करमत नव्हत. प्रशांत हा सहा ते सात वर्षांचा मुलगा, वडिलांच्या अचानक बदलीमुळे प्रशांतला या गावात याव लागल होत. प्रशांतचे वडील कोल्हापूर जवळ असलेल्या एका (एम.आय.डी. सी.) कंपनीमध्ये कामाला होते. पगार ही थोड्या पैकी चांगला मिळत असल्याने, ते या गावातच सेटल व्हायच ठरवले. प्रशांतच्या घरामध्ये प्रशांतचे आई-वडील व एक मोठा भाऊ असा परिवार.

आता प्रशांत बारा वर्षांचा आहे. तर त्याचा मोठा भाऊ अठरा वर्षांचा. आता प्रशांतला या गावाची सवय झाली होती. गावात त्याच्या वारगीच्या अनेक चांगल्या मित्रांशी त्याची मैत्री झाली होती. तसेच प्रशांतच्या वडिलांची ही, त्यांच्या बरोबर च्या मित्रांशी ही चांगलीच जोड जमली होती. प्रशांतचे वडील कामावरून

संध्याकाळी सहा वाजता घरी यायचे ते लगेच गावातल्या मित्रानं बरोबर बाहेर जायायचे. ते येताना दारू पिऊनच यायचे. इतके दारू प्यायचे की, घरी आल्यावर प्रशांतला व प्रशांतच्या आईला मारहाण करायचे. प्रशांतचे वडील मुंबईत असताना दारू पित नव्हते. पण गावाकडे आल्यावर त्यांना सवय लागली होती. या गावातले सर्वच गावकरी व तरूण पिढी दारूच्या आहारी गेले होते. हळूहळू प्रंशातचा मोठा भाऊ देखील दारूच्या इतका आहारी गेला होता की, त्याला आणण्यासाठी प्रशांतला जावाव लागायच. हे फक्त प्रशांतच्या घरी न घडता, गावातल्या प्रत्येकाच्या घरात घडायच. गावातले लोक शेतातुन व कामावरून घरी आल्यावर गावात असलेल्या देशी दारूच्या दुकानापुढे रांगच लावायचे. हा रोजचा क्रम सगळ्यांचा ठरलेला होता. त्यामध्ये प्रशांतचे वडील देखील असायचे.

एक दिवस प्रशांत, त्याच्या एका मित्राच्या घरी अभ्यासाला गेला होता. तेव्हा प्रशांतच्या मित्राची आई रडत होती. त्याच्या मित्राला प्रशांतने विचारले, अरे तुझी आई का रडते. तेव्हा तो मित्र म्हणाला, अरे आज आम्हच्या घरातल सगळ कडधान्य संपल आहे. आज दुपारी आम्ही जेवलो सुध्दा नाही. माझ्या वडीलांनी पैसे ही दिले नाही. हे सांगत तो मित्र रडत होता. तितक्यात

प्रशांतच्या मित्राचे वडील दारू पिऊन घरात येतात. तेव्हा ते आपल्या बायकोला जेवायला वाढ अस सांगतात. तेव्हा ती माता म्हणते, आज जेवन केलेल नाही. तेव्हा ते मित्राचे वडील त्या मातेला मारहाण करण्यास सुरवात करतात. वडीलांना आडवण्यासाठी गेलेला प्रशांतच्या मित्राला ही मारहाण करतात. प्रशांतला खुप राग येत असतो. प्रशांत रागाने आपल्या घरी जातो. आपल्या आईकडून थोड फार का होईना जेवण घेऊन, त्या मित्राच्या घरात नेहुन देतो. तेव्हा कुठे त्या दोघांच्या पोटात दोन घास जाते. अशी परिस्थिती प्रशांतला प्रत्येकाच्या घरात दिसत होती. प्रशांत रात्र भर हाच विचार करत असतो. दुसऱ्या दिवशी प्रशांत सायकाळी पाच वाजता शाळा सुटल्यावर घरी येतो. तेव्हा प्रशांतचे वडील देखील सहा वाजता येतात. आज प्रशांतचे वडिल मित्रांबरोबर न जाता घरीच बसलेले असतात. कारण आज ते जरा चेहऱ्यावरून अश्यक्त वाटत होते. सात वाजण्याच्या सुमारास प्रशांत अभ्यास करीत असताना, त्याच्या वडीलांना अचानक रक्ताची उलटी होते. त्यांना दवाखान्यात नेण्यात येत. डॉक्टर त्यांना सांगतात, दारूच्या आती सेवनामुळे त्याच्या लिव्हरला सूज आली आहे. त्यामुळे त्यांना इथून पुढे स्वतःची काळजी घ्यावी लागणार. नाहीतर त्यांच्या जीवाला पुढे धोका आहे. प्रशांतच्या वडीलांना चार-पाच दिवसानी डिचार्जे देण्यात आला. काही दिवस प्रशांतच्या

वडीलांनी आराम केला. पण त्यानंतर ते पुन्हा दारू पिऊ लागले. प्रशांतच्या शाळेतल्याच एका मित्राच्या वडीलांचे दारू पिऊन मुर्त्यु झाला होता. त्यामुळे त्याचे संपुर्ण कुटुंब वाऱ्यावर पडले. प्रशांत याच गोष्टींचा विचार रात्रभर करीत होता. त्याला पहाटे कुठेतरी झोप लागली. दुसऱ्या दिवशी शनिवार असल्याने, सकाळची शाळा होती. प्रशांत आज सकाळी लवकरच साडेसहा वाजता शाळेमध्ये गेला होता. शाळेमध्ये गेल्यावर शिपाई मामाने प्रशांतला विचारले, अरे प्रशांत एवढ्या लवकर का आलाईस. शाळा आठ वाजता आहे ना. काय नाही ओ मामा, झोप येत नव्हती आणि घरात बसून काय करायच. त्यामुळे आज लवकर आलोय. अस प्रशांतने शिपाई मामाला सांगितले. तेव्हा शिपाई मामा म्हणाले, बर ठीक आहे. बस इथे पेपर वाचत, मी वर्ग उघडून येतो. अस म्हणून शिपाई मामा तिथून निघून गेले. प्रशांत थोडा वेळ इकडे तिकडे करून टाईमपास म्हणून पेपर हातात घेतला. ठळक अक्षरे वाचत बसला. तेव्हा त्याची नजर आतल्या पानावर असलेल्या बातमीवर गेली. ती बातमी बघून प्रशांत आंनदी झाला. त्यांनी ती बातमी वाचण्यास सुरवात केली. ती बातमी अशी होती की, "सांगली जिल्ह्यातील आज एक गाव दारूमुक्त झाल." ही बातमी वाचून प्रशांतला अस कळाल की, आपण दारूवर बंदी आणू शकतो. त्याला या योजनेची संपूर्ण माहिती हवी होती. तितक्यात शाळेचे मुख्याध्यापक शाळेत

आले. तेव्हा प्रशांत मुख्याध्यापक सरांकडे गेला. आणि सराना तो पेपर दाखवला. तेव्हा प्रशांत सराना म्हणाला, सर मला देखील आपल गाव दारूमुक्त गाव करायचं आहे. आज आपल्या गावातील सर्वच लोक दारूच्या आहारी गेले आहेत. त्यामुळे काहीजणाचा मुत्यू देखील झालेला आहे. सर आज माझे वडील व माझा मोठा भाऊ सुद्धा या व्यसनाच्या आहारी गेले आहेत. उद्या यांच्या नांदान माझ्याबरोबरची पिढी देखील व्यसनाच्या आहारी जाऊ शकते. त्यामुळे मला आपल गाव व्यसनमुक्त करायच आहे. या बारा तेरा वर्षाच्या मुलाचे बोलने ऐकून सरांचे डोळे भरून आले. सरानी प्रशांतचे कौतुक करून त्याला या योजनेची माहिती दिली. त्यासाठी प्रशांत तुला गावातल्या संपुर्ण लोकांना दारू त्यांच्या जिवाला किती घातक आहे. ते पटवून दिले पाहिजे. सरकार कडून एक फोर्म मिळतो. तो फोर्म भरून त्यावर गावातल्या प्रत्येकांची नावे व सह्या घेऊन ते शासनाकडे पाठवायचे. मग काही दिवसानी शासनाचे अधिकारी गावात येऊन, सगळ्यांना प्रत्यक्ष पणे विचारतील. तुम्हाला या गावात दारूदुकान हवे की नको. शासन दुकान बंद करायच की नाही हे गावातल्या लोकांचे म्हणने विचारात घेऊन ठरवत. शासनाच्या माणसाना विचार पटला तर लगेच ते दुकान कायम स्वरूपी बंद करतात. हे सगळ ऐकून प्रशांत सरांना म्हणतो, सर मी हे सगळ लवकरात लवकर करेन. त्यासाठी

लागणारा फोर्म मला कुठे मिळेल. तेव्हा मुख्याध्यापक सर म्हणात, प्रशांत बाळ तुला फोर्म उपलब्ध करून द्यायची जबाबदारी माझी. सोमवारी लगेच सर प्रशांतला बोलवतात. प्रशांतच्या समोरच, प्रशांतच्या नावाने फॉर्म भरुन त्याच्या हातात देतात. त्याखाली प्रशांतला स्वतःची सही करण्यास सांगितात. फोर्मच्या पाठीमागे गावातील सगळयांची नावे व सह्या घेण्यास सांगतात. शाळा सुटल्यावर प्रशात ही बातमी आपल्या मित्राना सांगतो. प्रशांतची ही कल्पना सर्व मित्रांना आवडते. प्रशांतची ही कल्पना एका मित्राने आपल्या आईला सांगितली. तो मित्र आईला सांगत असताना, त्याच्या वडिलांनी ऐकली. त्या वडीलांनी ही गोष्ट दारू विकणाऱ्या मालकाला सांगितली. मालक संतापला. त्यांन सर्व दारूड्यांना यांच्या विरोधात भडकवल. आपापल्या घरच्याना आपल्या पध्दतीने टाकीत द्या. नाही तर आपल्याला परत कधीच गावात दारू मिळणार नाही. अस सांगितल्याने गावातली सर्व दारूडे भडकून आपापल्या मुलाबाळांना मारहाण करू लागले. त्यात प्रशांतचे ही वडील होते. काही दिवस या योजने बद्दल कुठे बातचीत केले नाही. सगळे दारूडे लोक शांत झाले होते. काही दिवसांनी गावची जत्रा होती. तेव्हा प्रशांतला एक कल्पना सुचली. गावातल्या सगळ्या मुला मुलीना एकत्र घेऊन, यात्रेत नाटक बसवायच त्यान ठरवल. त्या नाटकातुन जेवडा व्यसनमुक्ती साठी संदेश देता येईल तितका

द्यायचा. अस प्रशांतने सगळ्या मुला-मुलीना सांगितल. दुसऱ्या दिवसापासून तालमिला सुरवात झाली. नाटक बसल. काही दिवसातच यात्रा चालू झाली. या मुलानी यात्रेत आपल नाटक सादर केल. त्यातुन त्यांनी दारू पिल्यामुळे माणसाला कसा त्रास होतो. याच उत्तम उदाहरण दिल. त्यांच्या घरच्यांना होणारा त्रास, दारूपिल्यामुळे होणारे आजार, दारूमुळे होणारे नुकसान, दारुमुळे उदवस्थ झालेले आतापर्यतचे कुंटूब, दारूमुळे मुतृ झालेल्याची परिस्थिती या सगळ्याचे सादरीकरण या मुलांनी यात्रेत करून दाखवल. त्याच बरोबर दारूबंदी ची योजना सुद्धा पटवून सांगितली. या मुलांचं नाटक पाहून सगळ्या बायकांना कौतुक वाटत होत. ज्या मुलांनी नाटकात काम केल होत. त्यातल्या पन्नास टक्के मुलांच्या पालकांनी आज पासून दारू सोडली. असे आपल्या मुलांना वचन दिल होत. संपूर्ण गावात आता चर्चा रंगली, ही मुले आता गावात दारूबंदी केल्याशिवाय गप्प बसणार नाहीत. एकीकडे दारू विकणार मालक, काही माणसाना अस शिकवत होता की, गावात जर शासनाची माणसे आलीत आणि त्यांनी जर विचारलं तुम्हाला दारूबंदी गावात हवी आहे का? तेव्हा तुम्ही त्यांना साफ नकार द्यायचा. ही बातमी प्रशांतला ही कळाली, तेव्हा प्रशांतने आपल्या पालकांच्या व मित्राच्या मदतीने गावातल्या सर्व बायकांची एकी करून, त्या फॉर्म वर नावे व सह्या घेऊन तो फॉर्म

शासनाकडे पाठवला. काही दिवसांनी कळाल, आज शासनाची माणसे गावात येणार आहेत. तेव्हा दारूबंदीला विरोध करणारया माणसानी गावच्या येशीवर शासनाच्या माणसाना आडवल. त्यांना सांगितलं. आम्हचा दारुबंदीला विरोध आहे, तुम्ही परत जावा. तितक्यात प्रशांत गावच्या येशीवर गावातल्या सर्व बायकांना व मुलांना घेऊन आला. आणि सर्वजण मोठं मोठ्यानी घोषणा करू लागले. "गावात दारु बंदी झालीच पाहीजेल, गावात दारू बंदी झालीच पाहिजे." हे सर्व चित्र पाहता शासनाच्या आधिकाऱ्यानी ओळख. सर्व पुरुष दारूबंदी विरोधात आहेत. तर सर्व महिला व मुले दारूबंदी च्या बाजूने आहेत. तेव्हा अधिकारी ही आता गोंधळून गेले होते. शासनाच्या एका अधिकाऱ्याने गावातून आलेला फॉर्म हातात घेतला. ज्याने अर्ज केलाय, त्याच नाव मोठयाने वाचल, त्याला पुढे येण्यास सांगितल. तेव्हा बारा-तेरा वर्षाच शेंम्बड पोरग म्हणजेच प्रशांत पुढे आला. तेव्हा ते अधिकारी पुन्हा गोंधळले. गावातली सर्व लहान मुले त्या अधिकाऱ्यांना हात जोडून म्हणाले, साहेब काहीही करा पण आम्हच्या गावात दारू बंदी करा. शासनाचे अधिकारी थोडा वेळ गप्प उभारून एकमेंकाशी चर्चा करून , त्या पोराच्या विनंतीला मान देऊन व प्रशांतच्या या धाडसीपणामुळे अखरे त्या आधिकाऱ्यानी गावातल्या दुकानाला कायमच टाळ लावण्यास सांगितल. हे ऐकतास गावातली सर्व

बायका पोर आनंदाने नाचू लागली. गावात दारूबंदी झाल्यामुळे अनेकांची सवय मोडून गेली. अखेर प्रशांतच गाव दारूमुक्त झाल. पेपर, न्युज चॅनलवर प्रशांतने दाखवलेल्या धाडसी कृत्याची चर्चा रंगू लागली. शाळेकडून गावात प्रशांतचा मोठा सत्कार केला गेला. तेरा वर्षाच्या या मुलांच्या धाडसी पराक्रमांमुळे, शासनाकडून प्रशांतला युवा समाजसेवक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. आता प्रशांत व प्रशांतचे घरचे त्याच बरोबर गावातील प्रत्येक कुटुंब आता गावात सुखाने नांदत आहे.

# शर्मिलाचा संसार

शर्मिला ही माझी बालमैत्रीण. अभ्यासात खुप हुशार. शर्मिलाची आई आणि माझी आई दोघीजण एकत्र शेतात कामाला जात असत. शर्मिलाचे वडिल देखील कामाला जात असल्याने, शर्मिला व तिचा लहान भाऊ आम्हच्याच घरात असायचे. शर्मिला मी आणि माझी बहिण दिवसभर एकत्र खेळायचो. संध्याकाळी ही आम्ही एकत्र अभ्यासाला बसायचो.

शर्मिला सातवीत असताना, अचानक एक दिवशी कोल्हापुर हुन तिला बघण्यासाठी पाहुणे आले होते. लगेच काही दिवसात शर्मिलाच्या वडीलानी शर्मिलाच लग्न लावुन दिल. शर्मिलाच जे वय अजुन खेळायच होत, नेमक त्याच वयात तिच लग्न झाल होत. शर्मिलाच अचानक लग्न झालेल पाहुन माझी बहिण खुप रडत होती. कारण तिला अस वाटल की, तिच ही एक दिवस अचानक अस लग्न लावुन तिला सासरी पाठवून देतील. म्हणुन ती चार दिवस निट जेवली सुध्दा नव्हती. माझ्या वडीलांनी तिला सांगितल, तु जर आता जेवली नाहीस तर तुझ आताच लग्न लावून देतो बघ. तेव्हा

पासुन माझी बहिण या बाबतीत, परत कधी रडलीच नाही. खुप दिवस झाले होते. शर्मिला गावाकडे आलीच नव्हती. आम्ही तिच्या आई-वडिलांना शर्मिलाबद्दल विचारल होत. पण ते ही काय बोले नाही. ते आधुन-मधुन कोल्हापुरला शर्मिलाकडे जात होते, पण ती इकडे येत नव्हती. एक दिवशी आम्ही झोपत असताना, माझी आई वडीलांना शर्मिलाबद्दल सांगत होती. शर्मिलाच कोल्हापुरात खुप हाल होत आहे. शर्मिलेला एक मुल देखील झाल आहे. शर्मिलाचा नवरा काहीच काम करत नाही. त्यामुळे ती कुठेतरी कामाला जाते. कामावरून आल्यावर तिचा नवरा तिला दारू पिऊन मारहाण करतो. तरीही शर्मिला तिकडे आपला संसार करत आहे. अस आई सांगत होती. हे ऐकून मला खुप वाईट वाटत होत. पुढे पाच वर्षानी शर्मिलाच्या वडीलांचा हार्टअटॅक ने मुत्यू झाला. तेव्हा वडिल गेल्याची बातमी कळताच, शर्मिला सासरी गेल्यापासुन पहिल्यांदाच गावाकडे आली होती. येतांना सोबत तीन मुले व काकट एक छोटस बाळ घेऊनच आली. पुढे वडिलांच बाराव करून, सासरी गेली ती परत गावाकडे आलीच नाही.

माझ पुढील शिक्षण घेण्यासाठी मी कोल्हापूरातील शिवाजी युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेश घेतला. कॉलेज परिसरातच राहण्यासाठी मला हॉस्टेल भेटल. कोल्हापूरातील अनेकांशी माझी चांगली मैत्री

झाली. मला माहित होत, शर्मिला कोल्हापूरात राहते. पण कुठे राहते ते माहित नव्हत. मी अनेकदा तिला शोधण्याचा प्रयत्न केला. पण ती सापडत नव्हती. एक दिवस कॉलेजला सुट्टी असल्याने, हॉस्टेल वरील सर्व मित्र रंकाळा फिरण्यासाठी गेलो होतो. तेव्हा माझा एक मित्र रंकाळयावर असलेल्या शेंगदाणे,फुटाणे विकणाऱ्या एका बाई कडे शेंणदाणे आण्यासाठी गेला. मी त्यांच्याकडे पाहिल. त्या शेंगदाणे विकणाऱ्या बाई जवळ चार छोटी-छोटी मुले होती. ती बाई त्या मुलांना गप्प बसवण्याचा प्रयत्न करत होती. त्यातल एक बाळ खुप रडत होत. त्यात माझा मित्र शेंणदाणे आण्यासाठी तिथे गेला होता. त्या बाईला काय सुचत नव्हत. गिर्हाईक करायच, काय पोर सांभाळायची. त्या चारीही मुलांचे चेहरे मला दिसत होते. पण त्या आईचा चेहरा मला दिसत नव्हता. म्हणुन मी त्यांच्याजवळ गेलो, तर मला धक्काच बसला. कारण ती माझी बालमैत्रीण शर्मिला होती. तिचा हा अवतार मला सहण होत नव्हता. त्यात तिच्या कपाळावर कुंकू ही नव्हत. म्हणजेच ती आता विधवा झाली होती. मला थोडा वेळ काहीच समजल नव्हत. मी शर्मिला म्हणुन हाक मारली. तिने मान वर करून माझ्याकडे पाहिल, पण तिने मला ओळखल नाही. मी तिला म्हणालो, ये शर्मिला ओळखलीस की नाही, मी तुझा मित्र बबन. तेव्हा कुठे शर्मिलाने मला ओळखले. शर्मिलाने आम्हाला तिच्या घरी नेल. तिच घर खुप छोट होत.

आम्ही गेल्यावर ते पुर्ण भरल. म्हणुन माझे दोन मित्र बाहेरच थांबले. शर्मिलाने ज्या छोट्या घरात आपला संसार मांडला होता, ते घरही भाड्याचे होते. शर्मिलाला मी दाजींन बद्दल विचारल. तेव्हा ती म्हणाली, त्यांनच दारू पिऊन-पिऊन लिव्हर खराब झाल्यामुळे, ते आम्हाला एक दिवशीं सोडून गेले. हे सांगुन ती खुप रडत होती. तिच्या रडण्याने माझ्या मित्रांच्याही डोळयात पाणी येत होत. ती अचानक उठून आम्हच्यासाठी काहीतरी करण्याचा प्रयत्न करत होती. ती एकेक डबे उघडून पाहत होती. तिच्या या वागण्यावरून तिची सगळी परिस्थिती मला कळाली. मी शर्मिलाला म्हणालो, शर्मिला आम्ही सगळी आता जेवण करून आलो आहोत. तु काही करू नकोस. थोड पाणी दे, आम्ही पिऊन निघतो आता. तिने पाणी आणि साखर दिल. ते घेऊन आम्ही बाहेर पडत असताना. अचानक दोन व्यक्ती शर्मिलाच्या दारी आले. ते शर्मिलेला म्हणत होते, आम्हच पैसे लवकरात लवकर द्या. आम्ही तुम्हाला थोड्याच दिवसाची मुदत देत आहोत. हे सगळ मी आणि माझे मित्र ऐकत होतो. तेव्हा मी शर्मिलाकडे एक नजर फिरवली आणि तिथुन निघुन गेलो. हॉस्टेलवर आल्यावर मला कशातच लक्ष लागत नव्हत. मी त्यारात्री झोपलोच नाही. रात्रभर मी शर्मिलाचाच विचार करत होतो. माझ्या बरोबर माझे मित्र देखील जागे होते. मी मित्राना म्हणालो, मला शर्मिलासाठी काही तरी मदत करायची आहे. तिचे

हे हाल मला बघवत नाही. तेव्हा त्यातला एक मित्र म्हणाला, हो रे बरोबर आहे तुझ. तिच या कमी वयातल हे दुःख नाही बघता येणार. त्यासाठी आपण सगळी मिळून तिच्यासाठी काहीतरी करूयाव. तेव्हा मी म्हणालो, अरे काय करायच आपण. एकांने आपले म्हणे मांडले, सगळी मिळून तिला पैश्याची मदत करूयाव. तेव्हा संकल्प म्हणाला, अरे पैश्याची मदत नको करायला. कारण पैसा हा शेवट पर्यंत टिकत नाही. त्या पेक्षा आपण अस करूयाव. आता शर्मिलाचा व्यवसाय शेंगदाणे व फुटाणे विकणे हा आहे. तर तिचा हाच व्यवसाय आपण ऑनलाईन करूयाव. मोठमोठ्या दुकानातुन शेंगदाणे फुटण्याची ऑर्डर घेऊन, कॉलेज सुटल्यावर त्या दुकानात त्यांची ऑर्डर आपण पोहच करायची. तिला घरीच बसून वेगवेगळे पदार्थ करण्यास सांगायचे. त्या पदार्थांची ही आपण विक्री करायची. पुढे आम्ही तस केल. शर्मिलाचा हा व्यवसाय हळुहळू पूर्ण कोल्हापूर जिल्ह्यात पोहचला. त्यातून शर्मिलेला प्रचंड फायदा ही झाला. शर्मिलाने इतरांकडून घेतलेले पैसे देऊन टाकले. पुढे शर्मिलेला खुप नफा होत असल्याने, त्या पैश्यातून एक घर स्वतःच विकत घेतल. शर्मिलाने मुलांना घराजवळ असलेल्या शाळेमध्ये घातल. पुढे शर्मिला ने घरगुती लोणचे, पापड, मसाले पदार्थ स्वतः हाताखाली कामाला बायका घेऊन तयार करण्याचा हा नवा व्यवसाय चालू केला. पुढे शर्मिलाचा हा व्यवसाय पाच

जिल्ह्यापर्यंत पोहचला. आता शर्मिलेला स्वतःच एक व्यासपीठ मिळाल असल्याने आता शर्मिला आपल्या मुलांन बरोबर आनंदात आहे. शर्मिलेला आता सुखात असलेल पाहून, आता आम्ही देखील आनंदात आहोत.

# दहा रुपयाचा मोबदला

गरिब कुटुंबातला सतीश. घरी आई-वडील दोघेही अडाणी. बाप शेतात राब-राब राबतो. तर आई कुंभाराच्या हाताखाली मडकी तयार करण्यासाठी जाते.

शहारा लगतच असलेल्या गावामध्ये सतीश व त्याच कुटुंब राहायच. गरीब असल्याने गावातील लोक त्यांना जास्त किंमत द्यायचे नाही. सतीश अभ्यात खूप हुशार होतो. सतीश नववी पास होऊन, त्याने दहावीत प्रवेश केला. दहावीच्या पहिल्याच महिन्यात त्याला कळाल, दहावीची बोर्डे परिक्षा फी भरावी लागते. तेव्हा त्याने शिक्षकांना विचारल, सर दहावी बार्डे परिक्षा फी किती असत्या. तेव्हा त्याच्या शिक्षकांनी त्याला सांगितल की, हजार-बारशेच्या आसपास असेल. तेव्हा त्याने ठरवल, आपण आपल्या आई-बाला न सांगता, आपण काम करू फी साठी पैसे जमवायच. तेव्हा सतिश दुसऱ्या दिवशी गावात असलेल्या सावकारांकडे कामासाठी गेला. तेव्हा सतिश त्या सावकारांला म्हणाला. मालक, मला तुम्हच्याकडे काही दिवस कामाला ठेवा. तुम्हच्या कडे असेल ती सर्व कामे मी करीन. मला दहावी बोर्डे परिक्षेसाठी फी जमा

करायची आहे. त्या साठी मी काम मागत आहे. मालक तुम्ही द्याल तो कामाचा मोबदला, मला तो मान्य आहे. तेव्हा तो मालक तिथे असलेल्या एका व्यक्तीला म्हणाला, अरे हे कुणाच पोर आहे र. तेव्हा सतिश म्हणाला, मालक मी बाबुराव तेवड्यांचा मुलगा. ते मालक सतिशला म्हणाले, तु उद्या पासुन दुपारच्या पुढे वाड्यावर कामासाठी ये. मी सांगेल ती सर्व कामे तुला करावी लागेल. तुझ्या कामाचा मोबदला, तुझ काम बघुन तुला महिण्याच्या शेवटी मिळेल. तेव्हा सतिश हा.. अस उत्तर देऊन घरी निघुन गेला. सतिश खुप खुश होता. गेल्या गेल्या तो रोजच नियोजन करू लागला. उद्यापासुन आपण पाच वाजता उठून अभ्यास करायच. मग साडे-सात वाजता शाळेत जायायच. शाळेतुन आल्यावर काय असेल ते खाऊन मालकाच्या वाड्यावर जायायच. अस त्यांन रोजच नियोजन करून ठेवला. दुसऱ्या दिवशी त्याने ठरवल्या प्रमाणे सकाळी उठून, अभ्यास करून शाळेत गेला. साडेअकरा वाजता शाळा सुटल्यावर सतिश घरी येऊन, जेवून लगेच मालकाच्या वाड्यावर निघून गेला. वाड्यावर गेल्यावर सतीशने मालकाला विचारल, मालक काय काम करू मी. तेव्हा मालकाने सतिशला कामे सांगातली, प्रथम तु गोठा साफ कर. म्हैस व गाईना नदिवर नेहून त्यांना अंघोळ घालुन आण. मग त्यांना चारा टाक. पहिला हि सर्व कामे कर, मग मला येऊन भेट. सतीशने लगेच आपल्या सर्व

कामाला सुरवात केली. सतीशची ही सर्व कामे दुपारी दोन पर्यत पुर्ण झाली. सतीश आता खुप थकला होता. परंतु मालक ओरडेल म्हणुन जास्त विश्रांती न घेता, तो मालकांन कडे गेला. मालक माझी सर्व कामे झाली. तेव्हा मालक म्हणाले, आता एक काम कर. माझ्या दोन कुत्र्यांना गावातुन फिरवून आण. मग गोठ्याजवळ साठलेल सर्व शेण शेतात घेऊन जा. आणि त्या शेणांची शेतात शेंडकुटे रच. सतिश मालकाने आणखी सांगितलेली कामे करण्यास सुरवात करतो. प्रथम त्याने कुत्र्यांना गावातुन फिरवून आणल. मग त्यान गोठ्यातल सर्व साठलेल शेण शेतात नेहून, शेणी रचु लागला. सतिशला शेणी रचायलाच सात वाजले. शेणी रचुन झाल्यावर तो मालकाकडे गेला. मालक माझी सर्व कामे झाली अस म्हणता. त्या मालकाने सतिशला दररोज हिच कामे करण्यास सांगितल. त्याला घरी जाण्याची मुभा दिली. सतिश आज खुप दमला असल्याने, तो घरी गेल्या गेल्या जेवून झोपी गेला. दुसऱ्या दिवशीं ही सतिशने ठरवलेल्या प्रमाणे आपल्या कामास सुरवात केली.

आता सतिश त्या मालकाकडे कामाला लागुन महिना भरला होता. सतिशला त्या मालकाने त्याच्या कामाचा अजुन मोबदला दिलेला नसल्याने, सतिशने आज कामावर गेल्या गेल्या मालकाला विचारला. मालक माझा पगार कधी देणार आहात. तेव्हा मालक

सतिशला म्हणाले, संध्याकाळी बघू. सतिश लगेच कामास सुरवात केली. आज काम जास्त असल्याने, सतिशला आजच काम पुर्ण करायला साडे-सात वाजले. सतिश आज खुश होता. कारण आज त्याला कामाचा मोबदला मिळणार होता. साडे सात वाजता सतिश परत मालकाकडे गेला. तेव्हा मालक दारू पिण्यामध्ये व्यस्थ होते. सतिशने मालकांना आवाज दिला. पण ते आपल्याच गुंगीत होते. म्हणुन सतिश डायरेक्ट मालकाजवळ गेला. मालक सतिशला म्हणाले, काय रे इथे का अलायस. काम झाल ना तुझ जा मग घरला. तेव्हा सतिश म्हणाला, मालक तुम्ही मला सध्यांकाळी माझा पगार देणार होता. हे ऐकताच, मालक पिसाळतो आणि सतिशला झोराची लाठ मारतो. सतिश खाली पडतो. तेव्हा मालक म्हणतो, कुठला तुझा पगार. जा गप्प घरला. उद्या पासुन येऊ नकोस तुझ तोंड दाखवायला. सतिश त्या मालकाच्या पाया पडतो, रडतो. मला माझा पगार द्या आणि मला कामावरून काढू नका. अशी विनंती करतो. तेव्हा तो मालक खिशातुन दहा रूपयची नोट बाहेर काढून, सतीशच्या अंगावर फिरकाडतो. हे घे तुझ्या महिन्याभराच्या कामाचा मोबदला. तेव्हा सतिश ती नोट उचलून घेऊन, घरी निऊन जातो. सतिशला खुप वाईट वाटत असत. कारण त्यांन मनापासुन काम केलेल असत. आणि त्या कामाचा मोबदला फक्त दहा रूपये मिळाल्याने, त्याला खुप राग येत असतो. सतिश आपल्या

आईवडीलाना घडलेला सर्व प्रकार सांगतो. तेव्हा वडील म्हणतात, तु कुठेच या पुढे कामाला जायायच नाही. तु फक्त आणि फक्त अभ्यास करायच. दुसऱ्या दिवसापासुन सतिश दिवसभर आपला अभ्यास करण्यामध्येच वेळ घालवतो. सतिशला मिळालेल्या कामाच्या मोबदल्याची, ती नोट सतिशने खर्च न करता. आपल्या पुस्तकामध्ये ठेवतो. सतिश दररोज सकाळी उठल्यावर पहिल्यांदा त्या दहा रुपयाच्या नोटेकडे पाहतो. मगच दिवसाची सुरवात करतो. सतिशने खुप मोठ व्हायच ठरवलेल असल्याने, तो फक्त अभ्यासाकडे आपल लक्ष केंद्रित करीत असतो. पुढे सतिशने दहावी बोर्डे परिक्षा दिली. परिक्षा झाल्यावर सुट्टीच्या दिवसात सतिश शेतात कामाला जाऊ लागला. काही दिवसांनी दहावी परिक्षेचा निकाल जाहीर होतो. त्यात सतिशच जिल्हात दुसरा आलेला असतो. ही बातमी घेऊन, सतिशचे वर्ग शिक्षक सतिशच्या घरी येतात. पण सतिश घरी नसतो. ही आंनदाची बातमी सतिशच्या घरच्यांना ही माहित नसते. तेव्हा सतिशचे वर्ग शिक्षक सतिशच्या घरच्यांना ही आंनदाची बातमी सांगतात. तेव्हा सतिशच्या आई-वडीलाच्या डोळयांतुन आंनदाचे अश्रु वाहू लागतात. तितक्यात सतिश देखील घरी येतो. त्याला ही बातमी कळाल्यावर त्याला विश्वास बसत नसतो. म्हणुन तो पळत शाळेमध्ये जातो. तिथे असलेल्या कॉम्प्युटर वर ऑनलाईन निकाल

बघतो. तेव्हा सतिश आनंदाने शाळेत नाचू लागतो. सतिश जिल्यात दुसरा आल्यावर ही, गावातल्या लोकांना काहीच त्याच्या बद्दल वाटत नसत. पण सतिशचे आजूबाजूच्या गावातुन खूप कौतुक होत असत.

पुढे सतिशच्या पुढच्या शिक्षणाची सगळी जबाबदारी त्याच्या शाळेतल्या शिक्षकांनी उचलली. सतिशला सरकारकडून त्याच्या शिक्षणासाठी थोडी तरी मदत मिळावी म्हणुन, त्याचे शिक्षक जिवाचे-रान करत होते. सतिशला पुण्यातल्या एका मोठ्या कॉलेजमध्ये शिक्षणासाठी शाळेतल्या शिक्षकांनी त्याला पाठवल. सतिश पुण्यामध्ये पाच वर्षे राहून, आपलं शिक्षण पूर्ण केल. सतिशला पुण्यामध्येही योग्य शिक्षकांचे व चांगल्या मित्राचे मार्गदर्शन लाभल्याने, त्यांन पुण्यात राहुन MPSC परीक्षा देखील दिली. मग सतिश पाच वर्षांनी गावाकडे परत आला. आपला मुलगा शिकून आल्याने, आईवडीलांना खूप अभिमान वाटत होता. पुढे काही महिन्यांनी MPSC परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्या परिक्षेमध्येही सतिशला यश मिळाल. सतिशला MPSC परिक्षेमधून चांगल्या पदाची सरकारी पोस्ट मिळाली. त्याच बरोबर त्याला सरकार कडून राहण्यासाठी प्लॉट देखील मिळाला. आता सतिश त्या प्लॉट मध्ये आपल्या आईवडीलान बरोबर आनंदात

राहत आहे. पुढे सतीशने अनेक परीक्षा दिल्या. त्यातही सतिशला यश मिळाल. आज सतिश एका जिल्ह्याचा कलेक्टर ऑफिसर आहे. त्याच बरोबर, सतिशने महिनाभर केलेल्या कामाचा मोबदला म्हणून मिळालेली दहा रुपयांची नोट सुद्धा, आज कलेक्टर ऑफिसमध्ये एका सोन्याच्या फ्रेम मध्ये आहे.

# सौंदर्या

सौंदर्या इनामदार ही, नाटकामध्ये काम करणारी व्यक्ती नसुन. आम्हच्या शहरामध्ये असलेल्या एका भिकारी वस्तीमध्ये राहणारी, एक गरीब मुलगी होय. नावा प्रमाणे तिला देवान इतक सुंदर बनवल आहे की, एखाद्या राजकुमारीला ही लाजवेल. अशी ही सुंदर सौंदर्या. भिकारी वस्तीमधील लोक म्हणतात, जेव्हा सौंदर्याचा जन्म झाला. तेव्हा तिच्या आई वडीलांनी, तिला आम्हच्या या वस्तीमध्ये असलेल्या कचऱ्याच्या कुंडीमध्ये फेकून दिल होत. तेव्हा कचऱ्याच्या कुंडीत एक लहान मुल रडतेल पाहुन, आम्हच्या वस्तीमधील काही महिलांनी तिला उचलून जवळ घेऊन तिचा उदरनिर्वाह केला. दिसायला सुंदर असल्याने वस्तीमधील सगळ्यांनी मिळून तिच नाव सौंदर्या ठेवल. सौंदर्या जेव्हा कचरा कुंडीत सापडली, तेव्हा ती दोन-तीन दिवसाची होती. मुलगी झाली म्हणुन तिला कोणीतरी फेकून दिल होत. सौंदर्याला भिकारी वस्तीमधील सगळया नागरीकांनी मिळून तिला पुन्ह जन्म दिला. वस्तीतील सगळी मुले दिवसभर भिक मागुन, संध्याकाळी या छोट्या सौंदर्या बरोबर खेळत. सौंदर्या ही वस्तीतील सगळयाची

लाडकी मुलगी झाली होती. हळूहळू सौंदर्या मोठी होऊ लागली. ती वस्तीतील लाडकी मुलगी असल्याने, ती सगळयानाच आई-बाबा, दादा-दिदी ,आजी-आजोबा अशी हाक मारत. त्यामुळे तिने सगळयाच्याच मनावर राज्य मिळवल होत. ती पाच-सहा वर्षाची असल्यापासुन तिने वस्तीतल्या मुलांबरोबर भीक मागण्यास सुरवात केली होती. सौंदर्या दिसायला खुप सुंदर असल्याने, तिला बघताच, पुढच्या माणसाला तिची द-या यायची. त्यामुळे पुढचा माणुस तिला पैसे द्यायचाच. सौंदर्या जेव्हा भिक मागण्यास जायायची. तेव्हा तिला शहरातील इतर मुले दप्तर घेऊन शाळेत जाताना दिसायचे. एक दिवशी रात्रीच्या वेळेला वस्तीमधील सर्व लोक एकत्र वस्तीत जमले होते. वस्तीतील सर्व मुले नाचत खेळत होतीत. सौदर्या मात्र एकटी गप्प एका कोपऱ्यात बसली होती. तेव्हा वस्तीमधील काही वयस्कर व्यक्तीनी सौंदर्याला जवळ घेऊन विचारले. सौंदर्या बाळ काय झाल तुला. आम्हच्यावर रागवली आहेस का? तेव्हा सौंदर्या रडत म्हणते, बाबा या शहरातली इतर मुले कशी दप्तर घेऊन शाळेत जातात. मग आपल्या वस्तीमधील मुले का? शाळेत जात नाहीत. अस म्हणताच वस्तीमधील कुणाकडे याच उत्तर नव्हत. आतापर्यत या वस्तीमधील कुणीच असा विचार केला नव्हता. ते या छोट्या सौंदर्याने केल होत. वस्तीतील सर्वानी सौदर्याला समजावून सांगितल. सौंदर्या बाळ

शाळेत जाण्यासाठी पैसा लागतो. तो पैसाच आपल्याजवळ नाही आहे. अस काही तरी सांगुन सौदर्याच रुसन दुर केल . तितक्यात सौदर्याने लगेच दुसरा प्रश्न विचारला, आपण सगळी जण भीक का मागतो? काम का करत नाही. तेव्हा तितल्या वयस्कर आजोबानी सांगितल, बाळ भिक मागण, हेच तर आपल काम आहे. आता सौंदर्याला तिच्या सर्व प्रश्नाची उत्तरे मिळाल्याने ती शांत झोपी जाते.

आता सौदर्या बारा वर्षाची झाली होती. तिला आता सगळ निट समजत होत. तिला आता भिक मागण ही पटत नव्हत. तरीही एक वेळेच्या जेवणासाठी का होईना. तिला भिक मागणे भाग पडायच. एक दिवशी ती मुंबई चौपाटीवर भिक मागण्यासाठी गेली. सौंदर्याने एका श्रींमत जोडप्याजवळ जाऊन, त्यांच्या कडून भिक मागितली. तेव्हा ते श्रींमत जोडपे, सौंदर्याच सौंदर्य पाहुन तिच्याकडेच एकटाक पाहत उभे राहतात. तेव्हा त्या श्रीमंत व्यक्तीची पत्नी पर्स मधून पाचशे रूपयाची नोट काढून सौंदर्याला देते. मग ती सौंदर्याला विचारते, बाळ तु कुठे राहतेस. तुझ नाव काय. तेव्हा सौंदर्या म्हणते, माझ नाव सौंदर्या. मी इथेच जवळ असलेल्या भिकारी वस्तीमध्ये राहते. अस सांगुन सौंदर्या तिथुन निघून जाते. त्याच रात्री भिकारी वस्तीमध्ये ते श्रीमंत जोडपे सौदर्याला भेटण्यासाठी येतात. वस्तीमध्ये ते आल्यावर सगळ्याना

वाटते की, हे आपल्या सगळ्याना काहीतरी देण्यासाठी आले आहे. पण तस नसत. वस्तीतल्या एका व्यक्तीला ते जोडपे विचारते, इथे सौंदर्या नावाची कोण मुलगी राहते का? तेव्हा एक लहान मुल हे ऐकुन सौंदर्याला पळत जाऊन बोलवून आणते. सौंदर्या कड़े कोणी तरी आले आहे, अस कळल्यावर सारी वस्ती एकत्र जमते. सौंदर्या येते. तेव्हा ते जोडप म्हणत, सौंदर्या बाळ तुझे आईवडील कुठे आहेत. तेव्हा सौंदर्या म्हणते, इथे जमलेले प्रत्येक जण माझे आईवडीलच आहेत. तेव्हा त्या जोडप्यांना काहीच समजत नाही. तरीही ते सौंदर्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून सगळ्या वस्तीतल्या लोकांना म्हणतात. मी डायरेक्टर विजय इनामदार आणि ही माझी पत्नी निर्माती संस्कृती इनामदार. आम्हाला एक मराठी चित्रपट करायचा आहे. त्यासाठी आम्ही एका मुलीच्या शोधात होतो. ती मुलगीच शोधत असताना, आम्हाला तुम्हची सौंदर्या दिसली. तर मी सौंदर्याला आम्हच्या चित्रपटाची अभिनेत्री करायच ठरवल आहे. त्यासाठी आम्हाला सौदर्याची व तिच्या आईवडीलांची परवांनगी हवी होती. सौंदर्यांने जर चित्रपटात काम केल, तर ती खुप मोठी अभिनेत्री बनेल. तिला प्रसिध्दी मिळेल, तिला खुप पैसा देखील मिळेल. त्याच बरोबर तुम्हच्या वस्तीच नाव देखील मोठ होईल. तेव्हा ते जोडपे सौंदर्यांला पण विचारते, सौंदर्या बाळ तु चित्रपटात काम करणार का? तुझी काय इच्छा आहे. तेव्हा सौंदर्या

म्हणते, मी सांगु शकत नाही. तुम्ही माझ्या या सर्व आईवडीलांनाच विचारा. पहिला त्यांची परवाणगी घ्या. तेव्हा वस्तीतले सर्व जण सौंदर्याला परवाणगी देतात. तेव्हा सौंदर्या त्या श्रींमत जोडप्याला म्हणते, मला चित्रपटात काम केल्यावर पैसा देऊ नका? त्या पैशातुन आम्हच्या वस्तीमध्ये एक शाळा बांधुन द्या. त्यामुळे आम्हच्या वस्तीतली सर्व मुले शाळेत जातील. या बारा वर्षाच्या मुलीचे हे बोल ऐकून, वस्तीतल्या सर्वांच्या डोळयात पाणी आल. त्या जोडप्यानीही सौंदर्याची अट मान्य केली.

दुसऱ्या दिवसापासुन सौंदर्याचा अँक्टिंग क्लास चालू झाला. तिच खाण-पिण, तिच बोलण-चालण सगळ या जोडप्यानी बदलून टाकल. पुढे लगेच शूटिंग ही चालू झाल. सोंदर्या चित्रपटात काम करत आहे, म्हणुन वस्तीतल्या प्रत्येकाला स्वतःचा अभिमान वाटत होता. पुढे काही महिन्यातच चित्रपटाच शुटींग ही संपल. चित्रपटात सौंदर्याने आपल्या नावाप्रमाणे इतक सुंदर काम केल होत की, त्या जोडप्यानी त्या चित्रपटाला सौंदर्याच नाव दिल. तो चित्रपट रिलीज देखील झाला. संपुर्ण महाराष्ट्रात सौंदर्या हा चित्रपट खुप फेमस झाला. त्या चित्रपटात बरोबरच सौंदर्याने प्रत्येकाच्या मनान आपल स्थान निर्माण केल होत. सौंदर्याचा हा चित्रपट महाराष्ट्रात खुप फेमस झाल्याने, अनेक न्युज चॅनलवाले सोंदर्या

टीमला मुलाखती साठी बोलावत होते. अशाच एका चॅनलवाल्यानी लाईव्ह मुलाखतीसाठी सोंदर्या टीमला बोलवल होत. लाईव्ह शॉ असल्याने ती मुलाखत संपूर्ण महाराष्ट्रात बघत होत. त्याच मुलाखत मध्ये सोंदर्याला पहिला प्रश्न विचारला की, तू भिकारी वस्तीमधून ते इथपर्यंत कशी आलीस. तेव्हा सोंदर्या म्हणते, या चित्रपटाचे डायरेक्टर व निर्माते यांच्यामूळे मी तिथपर्यंत पोहचले. मी जेव्हा मुंबई चौपाटीवर भिक मागण्यांसाठी गेलो, तेव्हा मी या दोन व्यक्तींकडे भिक मागितली. त्यांनी दिली सुध्दा, त्याच बरोबर यांनी माझ संपुर्ण आयुष्यच बदलून टाकल. माझ्या वस्तीतून ते इथपर्यंत येण्याचं सगळं श्रेय या दोन व्यक्तींना जाते. संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येकाच्या अंगावर, सोंदर्याच्या या बोलण्याने अंगावर काटा येत असावा, अशी मुलाखत लाईव्ह चालू होती. मुलाखत मध्ये सौंदर्याला दुसरा प्रश्न विचारला की, सौंदर्या तुझा जन्म कुधी, कुठे व कसा झाला. तेव्हा सौंदर्या म्हणते, तुम्ही मला सगळयात अवघड प्रश्न विचारला. माझा जन्म कधी, कसा व केव्हा झाला पण याच उत्तर माझ्याकडे नाही. लगेच तिला शेवटचा प्रश्न विचारला, सौंदर्या तुला आता पर्यत असा कोणता तरी प्रश्न पडला आहे का? त्याच उत्तर अजून पर्यत तुला मिळाल नाही. तेव्हा सौंदर्या म्हणते, मला आता पर्यत पडलेला असा प्रश्न आहे की, मला जन्म कोणी दिला? आणि याच उत्तर अजुन मला मिळाल नाही.

पुढे सौंदर्या म्हणते, मी दोन दिवसाची असताना. मला भिकारी वस्तीत असलेल्या कचरा कुंडीत कुणीतरी फेकून दिल होत. तेव्हा त्या वस्तीतल्या माणसानी माझ जतन केल. आणि मला पुन्ह जन्म दिला. हे सांगताना सौंदर्यां खुप रडत होती. सौंदर्यांचा जीवन प्रवास ऐकूण संपूर्ण महाराष्ट्राच्या डोळ्यातही पाणी येत होत. मी माझ्या आईवडीलांना दोषी माणार नाही. कारण त्यांनी जर मला नाकारल नसत. तर मी भिकारी वस्तीत पोहचलेच नसते. त्या वस्तीतल्या सर्व व्यक्तीची माया मला कधी मिळालीच नसती. त्यांच जीवन काय असत, ते देखील मला कधी कळाल नसत. तेव्हा अचानक लाईव्ह शॉ चालू असतानाच या चित्रपटाचे डायरेक्टर व निर्माती सौंदर्याच्या पाया जवळ जातात. आणि मोठ्याने म्हणतात, पोरी मला माफ कर. आम्हीच तुला फेकून दिल होत. तुझ्या आताच्या बोलण्यावरून कळाल की, तु आम्हचीच मुलगी आहेस. कारण बारावर्षापुर्वी मुलगी झाली म्हणुन, त्या वस्तीमध्ये आम्हीच तूला फेकल होत. एका पाठोपाठ चार मुली झाल्या, पाचवा मुलगा होईल या आशेत होतो. पण पाचवी सुद्धा मुलगीच झाली. तेव्हा आम्ही हा निर्णय घेतला. हे सगळ लाईव्ह शॉ मध्येच घडत होत. आता सौंदर्याला तिचे जन्मदाते मिळाले होते. पण ती आता त्यांना स्विकारेल का? या कडेच संपुर्ण महाराष्ट्राच लक्ष होत. पण तस काहीच झाल नाही. सौंदर्याने तिच्या आईवडीलांकडून फक्त

वडीलांच नाव व आडनाव मागितल.पण त्याच्या बरोबर राहण्यास नकार दिला. पुढे तिने त्याच्याबरोबर मॅडम आणि सर याचच नातं ठेवल. तिने आपल्या आईवडीलांचा स्वीकार केला नाही. त्या दोघांनी सौंदर्याला दिलेल वचन पुर्ण केल. त्यांनी भिकारी वस्तीमध्ये मोठी शाळा बांधुन सर्व मुलांचे शिक्षण मोफत केले. हे सगळ वस्तीत फक्त सौंदर्यामुळे घडत होत. आता वस्तीतली सगळया मुलांनी भिक मांगणे बंद करून, शाळेत जाण्यास सुरवात केली. आता सौंदर्या व वस्तीतली सर्वजण सुखाने वस्तीत राहत आहेत.

# घात मैत्रीचा

आज प्रिती अठरा वर्षाची झाली होती. प्रिती ही श्रींमत घराण्यातली मुलगी असल्याने, तिला लहानपणापासुन ते आतापर्यंत काहीच कमी पडलेल नाही. त्यात वडीलांची लाडकी मुलगी असल्याने, लहान पणापासुन ती फोर व्हिल्लर मधुनच शाळेला जायायची. तिच्या लहाणपणासुन तिच्या गाडीचा ड्रायव्हर बंडू काका तिच्या बरोबरच असायचे. बंडू काका प्रितीला स्वत:च्या मुलाप्रमाणे सांभाळायचे. प्रिती फक्त शाळेत जाण्यासाठीच घराबाहेर पडायची. कारण तिला सर्व काही घरीच मिळायच. तिची शिकवणी ही घरीच व्हायची. तिच्या मैत्रीणी ही, हाताच्या बोटावर मोजता येतील तेवढ्याच. त्या ही प्रितीच्याच घरी यायच्या. त्यामुळे प्रितीचा बाहेरच्या जगाशी व तिथल्या माणसांशी जास्त संबंध कधी आला नाही.

आज प्रितीचा कॉलेजमधला पहिला दिवस होता. तिच्यासाठी आता सगळ नविन होत. तिथल्या मैत्रीणी ही तिच्यासाठी नविन होत्या. पण हळूहळू प्रितीला त्यांची ही सवय होऊन गेली. प्रिती दिसायला खूपच सुंदर होती. लांब लचक तिचे केस, सडपातळ शरीर व घारे डोळे. या रुपामुळे ती खूपच सुंदर दिसायची. तिच्या या सौंदर्यामुळे कॉलेज मधल्या सर्व मुली तिच्या

अवती-भोवतीच असायच्या. प्रिती सगळयांशी प्रेमाने व आपुलकी ने वागायची. तिला श्रीमंतीचा जरा सुद्धा माज नव्हता. प्रितीला कॉलेजची परी म्हणून सगळे ओळखू लागले. पुढे प्रितीची मुलांशी ही, हळूहळू ओळख होऊ लागली. बोलू लागली. त्यातलाच रमेश नावाच्या मुलाशी प्रिती जास्तच संपर्कात येऊ लागली. प्रिती सकाळी अकरा वाजता कॉलेजमध्ये यायची व सायंकाळी ठीक पाच वाजता घरी जायायची. तिला सोडण्यासाठी व आण्यासाठी बंडू काका तिच्या बरोबर असायचे. पुढे कॉलेज सुरु होऊन सहा-सात माहिने उलटून गेल. आता प्रिती व प्रितीचे सर्व मित्रमैत्रीणी एकमेकांशी क्लोज झाले होते. त्यात प्रिती व रमेश एकमेकांशी जास्तच क्लोज झाले होते. ते हळूहळू एकमेकांच्या प्रेमात पडू लागले होते. अखेर ते प्रेमात पडले. त्या दोघांच प्रेम प्रकरण फक्त संदीप व अक्षयलाच माहित होत. पुढे दोन वर्षानी त्यांच बारावी पर्यतच कॉलेज ही संपल. पुढे महाविद्यालयामध्ये प्रिती आपल पुढील शिक्षण घेण्यास सुरवात केली. रमेशची आर्थिक परिस्थिती नसल्याने, बारावी झाल्यावर त्यांन आपल शिक्षण बंद केल. त्याच बरोबर रमेशचे दोन मित्र संदीप व अक्षय हे दोघे ही, महाविद्यालयात शिक्षण घेत होते. रमेशने आपल शिक्षण बंद केल्यावर, तो एका खाजगी कंपनीमध्ये कामाला जात होता. त्यामुळे त्याची व प्रितीची शक्यतो भेट होत नव्हती. तरीही प्रितीच प्रेम रमेशवरच होत. त्याच

ही प्रेम प्रितीवर होत. पण आता रमेशच मन आतल्या-आत खचत जात होत. कारण प्रिती ही श्रीमंत घराण्यातली मुलगी, मी गरीब घराण्यातला मुलगा. आम्हच जर पुढे लग्न झाल, तर प्रिती माझ्याबरोबर सुखाने राहु शकणार नाही. रमेश प्रितीच्या पुढच्या आयुष्याचा विचार करून, प्रितीवर आपल प्रेम नाही आहे. अस खोट प्रितीला सांगायच ठरवतो. रमेशचा आपल्या दोन मित्रांवर खुप विश्वास असतो. रमेश त्यांच्याकडून प्रितीला निरोप झाडतो, कॉलेजच्या लंचच्या वेळेमध्ये रमेशने तुला कॉलेजच्या बाहेर भेटण्यास बोलवल आहे. ते दोघे असाच निरोप प्रितीला जाऊन सांगतात. ते भेटतात. रमेश धाडस करून प्रितीला सगळं सांगतो. तेव्हा प्रिती रडत असते. रमेश तिथुन निघून जातो. या दोघांचे बोलणे चोरून संदीप व अक्षयने ऐकलेल असत. प्रिती वर्गात जाऊन आपल्या मैत्रिणीला म्हणजेच प्राजक्ताला रडत सांगते. तेव्हा प्राजक्ता तिला समजावून सांगते. हे सगळे मुले असेच असतात. तू त्याचा विषय डोक्यातून काढुन टाक. प्रिती थोड्या वेळाने शांत होते. ती चार-पाच दिवस कॉलेजमध्ये जातच नाही. रमेश घरी जाऊन खूप रडतो. कारण त्याच प्रितीवर जीवापाड प्रेम असत. तो प्रितीला हळूहळू विसरण्याचा प्रयत्न करित असतो. काही दिवसांनी प्रिती आपल सगळ दुख बाजुला ठेऊन, कॉलेजमध्ये जाण्यास सुरवात करते. तिला रमेशशी शेवटच का होईना बोलावस वाटत.

ती खूप विचार करून संदीप व अक्षयला म्हणते, तुम्ही रमेशला जरा समजावून सांगा. कारण तो माझ्यावर खुप चिडला आहे. मला त्याच्याशी एकदा बोलायच आहे. हा आम्ही त्याला सांगतो, अस म्हणुन ते दोघे निघुन जातात.

संदिप व अक्षय हे दोघे दारूच्या व इतर व्यसनाच्या आहारी गेलेले असतात. या दोघांचा प्रितीवर कॉलेजपासून डोळा असतो. पण त्यांचा मित्र रमेशच प्रितीवर प्रेम असल्याने ते प्रितीचा विचार करण्यास सोडून दिलेले असतात. पण आता पुन्हा त्यांच्यातली ती वृत्ती जागी झालेली असते. ते दोघे जण प्रितीबद्दल एक कट रचतात. दुसऱ्या दिवशी कॉलेजमध्ये प्रितीला एक खोटा निरोप सांगतात. रमेशने तुला संध्याकाळी कॉलेज सुटल्यावर, आपल्या जुन्या कॉलेजच्या पाठीमागे भेटण्यासाठी बोलवल आहे. रमेशने आणखी सांगितलं की, तो आल्या शिवाय जाऊ नकोस तिथून, कारण त्याला कामावरून येण्यासाठी उशीर ही होऊ शकतो. तेव्हा प्रिती त्या दोघांना थँक्स म्हणून निघून जाते. ते दोघे त्या दिवशी कॉलेजच्या लंचमध्येच घरी निघून जातात. आज प्रिती कॉलेजमध्ये आनंदात दिसत होती. ती रमेशला भेटणार होती. ही आनंदाची बातमी प्रिती फक्त प्राजक्ताला सांगते. ती प्रितीला भेटायला न जाण्याचा सल्ला देत असते, पण प्रिती आपलच खर करते. कॉलेज

सुटल्यावर प्रिती बंडू काकांची नजर चुकवून जुन्या कॉलेजच्या पाठीमागे रमेशला भेटण्यासाठी जाते. इकडे बंडू काका प्रितीची वाट पाहून दमतात. कॉलेज मधली सर्व मुले तर घरी गेलीत. मग प्रिती अजून का आली नाही म्हणुन, बंडू काका कॉलेजमध्ये चौकशी करतात. पण तिथले शिपाई मामा सांगतात. सगळे मुले तर घरी गेलीत. मी आताच सगळे वर्ग चेक करून आलो आहे. बंडू काकाच्या मोबाईल वर प्रितीच्या आईचा फोन सारखा येत असतो. बंडू काका प्रितीच्या आईला सांगतात, प्रिती कॉलेजमध्ये नाही आहे. मी नेहमी प्रमाणे कॉलेजच्या बाहेर उभा होतो. पण प्रिती माझ्याकडे आलीच नाही. जरा तुम्ही तिच्या मैत्रिणीकडे चौकशी करा. अस बंडू काका प्रितीच्या आईला सांगतात. प्रितीची आई खूप घाबरून चौकशी करते. पण ती मैत्रिणीकडे ही नसते. शेवटी बंडू काका मालकांना फोन करून सगळ सांगतात. मालक व इतर साथीदार प्रितीचा शोध घेण्यास सुरवात करतात. रात्रीचे सात वाजले होते. अजून रमेश तिकडे आला नव्हता. प्रिती रमेशची वाट पाहतच अजून उभी होती. खूप अंधार असल्याने प्रिती खुप घाबरत होती. तितक्यात संदीप व अक्षय दारू पिऊन प्रिती जवळ पोहचतात. ते दोघे प्रितीचा घात करतात. ते नराधाम मित्र, प्रितीवर अत्याचार करून तिला एका नदीत फेकून देतात. एकीकडे रमेशला मात्र यातल काहीच माहित नसत.

रात्रीचे दहा वाजले तरीही प्रिती सापडत नसल्याने, प्रितीच्या आई-वडिलांनी शेवटी पोलीस स्टेशनमध्ये धाव घेतली. पोलीस ही लगेच प्रितीचा शोध घेण्यास सुरवात केली. दुसऱ्या दिवशी कॉलेजमध्ये प्रिती गायब असल्याची चर्चा रंगली. पोलिस चौकशी साठी कॉलेजमध्ये आले. तेव्हा पोलिसांनी तिच्या सर्व मित्रमैत्रिणीची चौकशी केली. त्या दिवशी प्राजक्ता कॉलेजमध्ये आली नव्हती. पोलिसांचा प्राजक्तावर थोडा संशय आला. कारण प्राजक्ता ही प्रितीची क्लोज फ्रेंड आहे. अस कॉलेजमधल्या सर्व मित्रमैत्रिणींनी सांगितल होत. नेमक आजच ती का कॉलेजमध्ये आली नाही. यामुळे पोलिसांचा प्राजक्तावर संशय आला असावा. तेवढ्यात पोलिसांना एक बातमी कळाली, शहरातल्या नदीमध्ये एका मुलीच प्रेत सापडल आहे. तेव्हा लगेच पोलिसांनी नदीकिनारी धाव घेतली. तेव्हा ते प्रेत प्रितीच आहे अस कळलं. कॉलेजमध्ये व शहरामध्ये प्रितीने आत्महत्या केली अशी बातमी पसरली. ती बातमी रमेश पर्यंत ही पोहचली. रमेशला तेव्हा काहीच समजत नव्हत. आपल चुकल, आपण तस नको सांगायला हवं होत प्रितीला. अस म्हणत रमेश स्वतःलाच दोष देत बसला होता. प्रितीच प्रेत पोस्टमॉर्टेम करण्यासाठी पाठवल. लगेच पोलिसांनी प्राजक्ताच्या घरचा पत्ता मिळवून तिला गाठल. पोलिसांनी प्राजक्ताची चौकशी केली. तेव्हा प्राजक्ताने सांगितल, प्रिती रमेश

नावाच्या मुलावर प्रेम करायची. त्यांन तिला नकार दिला होता. प्राजक्ताला रामेशशी बोलायच होत. काल रमेशने तिला जुन्या कॉलेजच्या मागे भेटण्यासाठी बोलवल होत. तितक्यात प्रितीच्या पोस्टमॉर्टेमचा रिपोर्ट येतो. तेव्हा त्या रिपोर्ट मध्ये नमूद असत, प्रितीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या केली आहे. तेव्हा प्रितीच्या वडीलांनी आपली सगळी टाकत पणाला लावुन, आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी अशी तक्रार करतात. पोलिसांचा तपास चालु असतो, पोलिसाना सगळे पुरावे रमेशच्या बाजुने मिळाल्याने रमेशला अटक केली जाते. प्रितीचे वडील श्रीमंत असल्याने पोलिसांना व वकिलांना पैसे देऊन, अखेर रमेशला फाशीची शिक्षा सुनावली जाते. काही दिवसातच रमेशला बलात्कार व खुन केल्याप्रकरणी फाशी दिली जाते. रमेशला मुर्त्य म्हणून घोषीत करतात. रमेशची काहीच चुक नव्हती पण पुरावे त्याच्याच बाजुने होते. प्रितीवर अत्याचार करणारे नराधाम मित्र मुकाट सुटले. पण आपली काडीची ही चुक नसताना सुद्धा बिचारा रमेश मात्र फासावर चढला.

# दारिद्र्याचा वारसा

एका गावामध्ये एक छोटस कुटुंब राहत होत. घरामध्ये अठरा वर्ष दारिद्रय. आई, वडील, मुलगी आणि शेखर हा मुलगा असा हा छोटासा परिवार. आई चार घरची भांडी घासुन संसाराचा गाडा चालवते, वडील स्वतःला लागतील इतकेच कमऊन दारू पित, तर मुलगी लग्नाला आलेली आणि शेखर हा सरकारी शाळेमध्ये शिक्षण घेत असत.

घरामध्ये एक वेळच जेवण मिळण मुश्किल, तर वडील काम केलेले पैसे घरी देत नसत. त्यातच शेखरचा दहावी बोर्ड परिक्षेचा निकाल जाहीर होतो. शेखर शाळेमध्ये पहिला येऊन त्याला दहावी बोर्ड परिक्षेमध्ये 90% मार्क मिळतात. शेखर आनंदाने ही बातमी आपल्या आईला सांगतो. आई मी दहावी बोर्ड परिक्षा पास झालो. मला 90 % मार्के पडले हे सांगून शेखर आपल्या आईच्या पाया पडतो. आईच्या डोळ्यातून अश्रुवाहू लागतात. आई आत जाऊन पाण्याचा ग्लास घेऊन येते व शेखरला म्हणते, बाळा तुझ तोंड गोड करण्यासाठी घरामध्ये साखर सुद्धा नाही. ये बाळ पाणी पी आणि तुझ तोंड गोड करून घे. शेखर उत्साहाने पाणी पितो व आईला

म्हणतो, आई मला IPS अधिकारी होऊन देशातील सर्व गुन्हेगारी नष्ट करायची आहे. त्यासाठी मला शहरामध्ये जाऊन चांगल्या कॉलेज मध्ये शिक्षण घ्यावे लागेल, त्यासाठी थोडे पैसे ही लागतील.

आई शांत राहते व शेखरला म्हणते, बाळा आतापर्यंत "दारिद्रयान आपली साथ कधी सोडली नाही आणि तुझ्या बाबानी ही साथ मला कधी दिली नाही." आतापर्यंत आपण आपल पोट मारत आलोय. आता आपण दोघ मिळून तरी कष्ट करूया. बाळा आता बास झाल तुझ शिक्षण. उद्यापासून माझ्याबरोबर शेतामध्ये कामाला यायचे. आपल्याला चार पैसे कमऊन तुझ्या बहिणीच लग्न करायच आहे. आता शेखर कडे दुसरा पर्याय नसतो. दुसऱ्या दिवसापासून शेखर शेतामध्ये कामाला जाऊ लागतो. त्यातच शेखरच IPS होण्याच स्वप्न मोडत. शेखरचा शेतात जाण्याचा रोजचा क्रम चालू होतो. असच बगता-बगता सहा महिने निघून जात. शेखरला ही चार पैसे मिळू लागतात. अचानक एक दिवशी रात्रीच्या वेळेला शेखर शेतामधून घरी जात असतो. तेव्हा शेखरला अचानक काळोख्या अंधारामध्ये शेताच्या कडेला चार माणसे बोलताना दिसतात. शेखर आडोशाला उभा राहून बगत असतो. त्या चार माणसान पैकी एक माणुस त्या तिघाना पैसे देत असतो.

तेव्हा शेखर आश्चर्य चक्कीत होतो. व शेखर विचार करू लागतो की, ही तिघे तर गावच्या कट्ट्यावर दिवसभर बसून असतात, ही तर काहीच काम करत नाहीत. तरी यांना इतके पैसे का दिले जातात. आणि मी दिवस-रात्र राबतोय मला इतके पैसे कधी मिळाले नाही. हा विचार करत शेखर घरी निघून जातो. दुसऱ्या दिवशी पण शेखरच्या मनामध्ये हाच विचार चालू असतो. शेखर त्या तिघाना जाऊन भेटतो. पुढे त्या तिघान बरोबर शेखरची चांगली मैत्री होते. पुढे त्या तिघान बरोबर शेखर खुन, दरोडे, चोऱ्या करून पैसे मिळवू लागतो. त्याच पैशामध्ये शेखरच्या घरी सुखाचे दिवस नांदु लागतात. पुढे शेखर आपल्या बहिणीच लग्न मोठ्या थाटा-माटात लाऊन देतो. आता शेखरच्या घरात ही सुखाचे दिवस आल्याने शेखर व शेखरचे घरचे ही आंनदात असतात. पुढे 5 ते 6 वर्षांनी शेखरला मोठी खुनाची सुपारी मिळते. त्याच खूनाच्या नादात शेखर पोलिसांच्या हाती सापडतो व शेखरला जन्मठेपेची शिक्षा मिळते. ज्या शेखरने वयाच्या पंधराव्या वर्षी IPS अधिकारी होऊन देशातील सर्व गुन्हेगारी नष्ट करायची स्वप्न पाहिलेला असतो, तोच शेखर आज गुन्हेगारी क्षेत्रामध्ये जाऊन स्वतःच आयुष्य संपून टाकतो.

# बावळट योग्या

एखाद्या योगेश नावाच्या मुलाला कोणीतरी योग्या म्हणुन हाक मारली की, मला खुप हसू येत. कारण योग्या हा माझा लहानपणीचा चड्डी दोस्त. योग्या हा शब्द माझ्या कानी पडला, तर मला माझ्या मित्राची म्हणजेच योगेशची खुप आठवण येते. आता तुम्ही म्हणाल, हा कोण योग्या. माझ्या लहानपणी आम्हच्या घराला घर लागुन असलेल्या, सुरेशकाकांचा मुलगा म्हणजेच योग्या. माझा व योग्याचा जन्म एकाच महिण्यात व एकाच दवाखान्यात झाला. अस आम्हच्या घरातली व योगेशच्या घरातली म्हणायचीत. मी आणि योग्या अंगणवाडी पासुन ते दहावी पर्यत एकाच शाळेत असल्याने, आम्ही दोघ एकत्र शाळेत जायायचो. एका वर्गात ही असल्याने एकाच बॅंचवर बसायचो. गावातली सर्व माणसे आम्हाला राम-श्यामची जोडी म्हणुन ओळखायचे. मी अभ्यासात थोडा हुशार होतो. तर योग्या थोडा कच्चाच. मला आठवतय, योग्या दहावी पुर्व परिक्षेपर्यत माझ्या मुळे पास झाला होता. कारण योग्याचा व माझा रोल नंबर जवळ जवळच पडत होता. आणि परिक्षेला देखील एकाच ब्लॉक मध्ये

नंबर पडायचा. त्यामुळे योग्या सगळ माझ्यातलच बगुन काढायचा. दहावी पुर्व परिक्षेपर्यत आम्हचा नंबर एकत्र असल्याने, योग्या पास होत होता. पण दहावी बोर्डे परिक्षेला योग्याचा नंबर दुसऱ्या शाळेत व माझा नंबर आम्हच्याच शाळेत पडला. त्यामुळे योग्या दहावी बोर्डे परिक्षा नापास झाला होता. योग्याला मी नापास झालो आहे, त्याच दु:ख त्याला वाटत नव्हत. इथुन पुढे योग्या माझ्या बरोबर कॉलेजला नसणार, याच मला जास्त दु:ख होत होत. पुढे मी मुंबईला शिकण्यासाठी आलो ते इकडेच आलो. योग्या मात्र गावाकडेच राहिला.

योग्याला गावात सगळी बावळट योग्या म्हणून ओळखत. तसा योग्या बावळटच होता. मला आठवतय, योग्या जेव्हा-जेव्हा घराबाहेर जायायचा. तेव्हा तो, घरी येताना भांडण घेऊनच यायचा. एकदा योग्याला गावात असलेल्या मिसळच्या गाड्यावरील मामांनी सांगितल की, पाच मिनिट तु गाड्यावर उभा रहा. मी घरी जाऊन लगेच येतो. अस सांगुन ते काका घरी गेले. योग्या गाड्यावर थांबला होता. थोड्या वेळान योग्या आपली करामत गाड्यावर दाखवलीच. त्या मामानी गाड्यावर केलेल्या मिसळच्या आमटी मध्ये योग्यान मुठभर चटणी टाकली. तर करून ठेवलेल्या चहामध्ये ही, योग्यात साखर टाकली. तितक्यात ते मामा आले. योग्या तिथुन

निघून गेला. थोड्या वेळानी गाड्यावर मिसळ खाण्यासाठी व चहापिण्यासाठी लोकानी गर्दी केली. गावामध्ये टपरीवरची मिसळ खुप फेमस होती. मामानी टपरीवर आलेल्या सगळ्या व्यक्तीना मिसळ व चहा दिले. तेव्हा काहीनी चहाचा एक घोट घेतल्यावर, तर काहीनी मिसळची थोडी टेस्ट केल्यानंतर अचानक सर्वाची मिसळ तिखट व चहा गोड झाल्याची तक्रार करू लागले. मिसळ खुप तिखट झाल्याने सगळ्याच्याच तोंडाला आग सुटली. सगळेच मामाला ओरडू लागले. त्या मामाला काहीच समजत नव्हतं. सकाळ पासून तर सगळं व्यवस्थित होत. मग हे कस काय झाल. इतके वर्षे मी हा व्यवसाय करतोय. तेव्हा माझ्या कडून अशी कधी चूक झाली नाही, मग आता कशी झाली. याचाच विचार करत मामा बसला. तितक्यात योग्या समोरून जाताना, मामाला दिसला. तेव्हा त्या मामांनी ओळखल, ही सगळी करामत योग्याचीच आहे. तो मामा गाड्यावर असलेल चहाच गाळण घेऊनच योग्याचा पाठलाग केला. पण योग्या काय मामाच्या हाती लागला नाही. पण संध्याकाळी मात्र आईच्या कचातीत सापडलाच. अशी अनेक करामत योग्या दररोज करायचाच. गावातील काही सकाळी लोक बाहेर गावी कामासाठी जायायचे, तर काही जण शेतात जायायचे. तर रात्रीच्या वेळेला सगळ्यांच्या गाड्या व साईकल्या दारात व अंगणात असायच्या. तेव्हा रात्री योग्या जेवून माझ्याकडे यायचा.

येताना मात्र योग्या घरातून सुई घेऊन यायचा आणि योग्या बाहेर व अंगनात लावलेल्या सगळ्या गाड्यांमधील हवा तर साईकल्या पंच्चर करून टाकायचा. सकाळी उठल्यावर सलमान पंच्चर दुकांच्या दारात सगळ्याची फज्जिती झालेली पाहायचा. आम्ही शाळेत देखील एकत्र बसायचो. तेव्हा शाळेत देखील योग्या कुठे कमी पडायचा नाही. शाळेत कोणतीही करामत झाली, तर त्यात योग्याच नाव हमखास असायच. आम्हच्या वर्गात मुली होत्या. त्या मुलीन बरोबर योग्याच कधी पटलच नाही. आम्ही जिथे बसायचो, त्याच्या पुढच्या बँचवर पोरी बसायच्च्या. तास चालू असताना एक दिवशी योग्याने, पुढे बसलेल्या तीन पोरींचे केस योग्यांन एकमेकांना गच्च गाठ्या मारू ठेवल्या होत्या. तास संपल्यावर जेव्हा त्या मुली एकमेकांन पासुन वेळल्या झाल्या. तेव्हा तिघींच्या तोंडातुन आई..ग असा शब्द बाहेर पडला. त्या तिघीनी मोठ्याने रडून शाळाच डोक्यावर घेतली होती. शिक्षकांना ही करामत कळताच, पाठीमागे बसलेल्या विद्यार्थ्यांना पाटील सरानी शिक्षा दिली. त्यात योग्या मी आणि मन्या आम्हा तिघांना सरानी मैंदाना भोवती दहा फेरफटका मारण्यास व शंभर बैठक्या मारण्याची शिक्षा केली. तिघांना घरला व्यवस्थित चालत जाता येत नव्हत. असे ना-ना प्रकार योग्या करायचा. जसा योग्या बावळट व आगावू होता, तसा खुप मायाळू देखील होता. तो गावातल्या वयस्कर व्यक्तींची

काळजी घ्यायचा. गावातल्या एखाद्या वयस्कर व्यक्तीला दवाखान्यात किंवा कुठेही जायचय असेल तर त्यांची काठी बनुन, योग्या त्यांच्या बरोबर जायायचा. यामुळे गावातील लोक योग्याच्या कारामतीवर पांघरूण घालायचे. योग्या काही जणांना आवडायचा तर काही जणांना आवडायचा नाही. पण योग्या मात्र गावची शान होती. आता देखील योग्या गावची शान आहेच. योग्या शिकला नाही. पण योग्याने शेती या व्यवसायामध्ये आपल करीयर केल. शेती बद्दल किंवा दुसरी कोणती ही अडचण गावातल्या लोकांना असल्यास, योग्या मदत करीत असतो. आज योग्या आणि मी पंचेचाळीस वर्षाचे आहोत. पण असा एकही दिवस माझा गेला नाही की, त्याची मला आठवत आली नाही. योग्या ही मला आधुन-मधुन फोन करीत असतो. मी जेव्हा-जेव्हा कामाच्या टेन्शन मध्ये असतो, तेव्हा मी योग्याची आठवण काढतो. तेव्हा माझ टेन्शन काही क्षणात निघून जात. असा या योग्यासारखा बावळट मित्र प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये एकतरी नक्की असावा.

# अनोळखी मुंबई

सुनील शाळेमध्ये व कॉलेजमध्ये असताना नाटकात काम करायचा. सुनीलला अँक्टटिंग करण्यास परफेक्ट जमायची. एखादा चित्रपट रिलीज झाला की, सुनील चित्रपट बघून त्यातली अँक्टटिंग शेमटू शेम करायचा. सगळी मुले त्याला म्हणायचीत, तू चित्रपटात काम कर. तुला खूप पैसा व प्रसिध्दी मिळेल. मित्रांचे बोलणे ऐकून सुनीलला ही वाटू लागत. आपण खरच चित्रपटात काम केल पाहीजेल. पण आपल्याला कोण चित्रपटात काम देणार. याचा विचार करत तो रात्र भर बसतो. सुनीलच्या घरची परिस्थिती चांगली असल्याने, घरची त्याला चित्रपटात काम करण्यासाठी आडवणारे नव्हते. दुसऱ्या दिवशी सुनीलने एका मित्राला विचारल, अरे मला चित्रपटात काम करायचं आहे. मला चित्रपटात काम कुठे मिळणार. तेव्हा त्या मित्राने सुनिलला सांगितलं की, तुला मुंबईला चित्रपटात काम मिळेल बघ. सुनिलला मुंबई कुठे आहे. हे सुद्धा माहीत नव्हत. सुनिल कसलीही चौकशी न करता. घरातून सहा हजार रुपये घेऊन मुंबईला रात्रीच्या ट्रेन न निघाला. तो सकाळ पर्यत मुंबईच्या दादर स्टेशनवर पोहचला. उतरताना गर्दी ऐवढी होती की,

त्या गर्दीमध्ये प्रशांतचा मोबाईल हरवला. सुनिलसाठी मुंबई ही अनोळखी होती. जिकडे-तिकडे माणसांची व वाहनांची गर्दी त्याला दिसू लागली. रात्र भर प्रवास केल्याने त्याला झोप येत होती. म्हणून त्याने स्टेशनजवळ असलेल्या एका हॉटेलमध्ये आपली रुम बुक केली. हॉटेल खूप मोठ होत. अशा हॉटेल मध्ये सुनिल पाहिल्यांदाच आला होता. गेल्या गेल्या रुमध्ये आंघोळ करून. थोडा वेळ बाहेर फिरुन आला. दुपारच व रात्रीच जेवण त्याच हॉटेल मध्ये करून सुनिल झोपी गेला. दुसऱ्या दिवशी सुनिल सकाळी लवकर उठून आपल सर्व सामान घेऊन, सुनिल रूमची किल्ली हॉटेलं मालकाकडे दिला. तेव्हा हॉटेल मालकाने त्याला बिलाची चिठ्ठी दिली. ती बिलाची चिठ्ठी पाहून सुनिल गोंधळून गेला. एका दिवसाच्या जेवणाचं व रूमच भाड, अस दोन्ही मिळून साडेचार हजार रुपयच ते बिल होत. सुनिलने घरातून फक्त सहा हजार रुपये आणल होत. आता इथेच त्याला साडेचार हजार रुपये द्याव लागणार होत. सुनिलने ना-ईलाजाने साडेचार हजार रुपये हॉटेल मालकाला दिले. सुनिल हॉटेल मधून बाहेर पडला. त्याच्या कडे आता फक्त पंधराशे रुपये शिल्लक होते. चित्रपटात काम कुठे मिळतय, याची चौकशी सुनिल करू लागला. दिवसभर तो फिरल्यावर एका ठिकाणी त्याला चित्रपटाची ऑडिशनची जाहिरात भेटली. सुनिला आंनद झाला. सुनिल लगेच खाली

दिलेल्या पत्याच्या ठिकाणी जाण्याच ठरवल. आता त्याला पत्याच्या ठिकाणी कस जायायच माहीत नव्हत. खेड्यातला सुनील, खेड्यातली भाषा असल्याने व त्याच्यासाठी ही मुंबई अनोळखी असल्याने. त्याला पत्ता सापडण मुश्कील होत. त्यामुळे सुनिल एका टॅक्सी वाल्याजवळ जाऊन, त्याला ऑडिशनच्या ठिकाणचा पत्ता सांगितला. लगेच टॅक्सीवाल्याने सुनिलला ऑडिशनच्या ठिकाणी पोहचवल. टॅक्सीच भाड शंभर रुपये झाले आहे. असे टॅक्सीवाल्याने सुनिलला सांगितले. सुनिलने शंभर रुपये भाडे दिले. सुनिलला हे सगळ आता परवडणार नव्हत. सुनिल ऑडिशंच्या ठिकाणी गेला. तिथे असलेल्या सरांना सुनिल म्हणाला, सर मला चित्रपटात काम करायच आहे. मी ऑडिशनसाठी आलेलो आहे. तेव्हा त्या सरानी सुनिलला सांगितलं, त्या मॅडम कडे जा आणि तुझा फॉर्म भर. सुनिल लगेच त्या मॅडमकडे गेला. मॅडम मला ऑडिशन द्यायची आहे. माझा फॉर्म भरा. त्या मॅडम लगेच सुनिलचा फॉर्म भरतात. सुनील आनंदात असतो. तेव्हा अचानक त्या मॅडम सुनिलला म्हणतात, ऑडिशनची तेराशे नव्वत रुपये फी भरा.सुनिलला काहीच समजत नाही. त्या मॅडम पुन्हा सुनिलला म्हणतात, सर ऑडिशनचे तेराशे नव्वत रुपये फी भरा. आता सुनिल कडे फक्त चौदाशे रुपये शिल्लक असतात. सुनिल ते ही ऑडिशनसाठी भरतो. सुनिलला उद्या दुपारी

बाराच्या सुमारास ऑडिशनसाठी याला सांगतात. सुनिल तिथून निघतो. उद्या ऑडिशन असल्याने आज कुठे राहायच याच विचारात सुनिल असतो. आता सुनिलच्या खिश्यात फक्त दहा रूपये असतात. दिवसभर काहीच खालेल नसल्याने, सुनिल दहा रुपयाचा एक वडापाव खातो. तेव्हा कुठे त्याच्या पोटात थोडी भर पडते. सध्यांकाळ होत असल्याने आता कुठे राहायच याचा विचार करत तो मुंबई फिरत असतो. त्याच्या ओळखीच मुबंईत कोणीच नसल्याने, सुनिल एका धर्मशाळेत राहण्याचा विचार करतो. त्या धर्मशाळेत अनेक लोक राहत असतात. सुनिल जवळ आता फक्त स्वतःची बॅग आणि कपडे ऐवढच साहित्य जवळ असत. सुनिल त्या धर्मशाळेत खाली बसतो. तो भुकेने व्याकुळ झालेला असतो. त्याला भुक सहन होत नसते. भुक लागल्यामुळे सुनिलला झोपही येत नसते. शेवटी सुनिल धर्मशाळेत असलेल पाणी पिऊन झोपी जातो. दुसऱ्या दिवशी सुनिल सकाळी उठल्यावर आपल्या बॅगेकडे पाहतो, पण त्याची बॅग त्याच्या जवळ नसते. सुनिल आपल्या आजूबाजूला सगळी कडे पाहतो. बॅग शोधण्याचा प्रयत्न करतो. पण त्याची बॅग त्याला कुठेच सापडत नाही. त्या धर्मशाळेत एक आजी असते. तिला सुनिल विचारतो, आजी तुम्ही माझी बॅग पाहिला आहात का? तेव्हा ती आजी म्हणते, बाळ तू मुंबईत नविन आहेस का? तेव्हा सुनिल त्या आजीला हो म्हणतो. बाळ, तुझी बॅग

कोणीतरी चोरून नेली असेल. कारण ही मुंबई आहे, इथे प्रत्येक माणूस जगण्यासाठी तडपडत असतो. त्यासाठी तो कोणत्याही ठराला जातो. चोऱ्या, हाणामारी,फसवणूक असे अनेक ना-ना प्रकार मुबंईत एका सेंकदाला घडत असते. त्यामुळे इथुन पुढे जरा जपुनच रहा. सुनिलला आता काहीच कळत नसत. त्याला बारा वाजता ऑडिशनला जायायच असत. पण त्याच्या कडे आता नविन कपडे नसतात. त्याच्या कपड्याची बॅग चोरीला गेल्याने, अंगावर असलेल्या त्याच कपड्यावर सुनिल ऑडिशनला निघतो. बरोबर साडेअकरा वाजता सुनिल ऑडिशनच्या ठिकाणी पोहचतो. तेव्हा सुनिलला धक्का बसतो. कारण ज्या हॉलमध्ये काल ऑडिशनचे फॉर्म भरून घेत होते. तिथे आता चक्क लग्न समारंभ चालू असतो. सुनिल तिथल्या वॉचमॅनकडे चौकशी करतो. तेव्हा तो वॉचमॅन म्हणतो, काल पाचच्या सुमारास ते इथून निघून गेले. आज सकाळ पासून ऑडिशनसाठी आलेला तू विसावा मुलगा आहेस. सकाळ पासुन मुलेमुली ऑडिशनसाठी येत असलेल पाहून, आम्हच्या कार्यालयाच्या संस्थापकांनी चित्रपट महामंडळाकडे चौकशी केली. तेव्हा आम्हाला कळाल, ते सगळे भोगस होते. त्यांचा व चित्रपट महामंडळाचा काहीही संबंध नसल्याचे त्यांनी सांगितल. नविन कलाकारांना चित्रपटात काम देण्याचं आश्वासन दाखवून त्याच्या कडून पैसे उकळण्याचा त्यांचा

धंदा आहे. अस त्या वॉचमॅनने सुनिलला सांगितले. हे सगळ ऐकुन सुनिल तिथेच रडू लागला. कारण त्यांची मोठी फसवणूक झाली होती. आता सुनिलने ठरवल होत. आपण या मुंबईत एकही क्षण राहायच नाही. सुनिल रागाच्या भरात तो दादर रेल्वेस्टेशनवर चालत कधी पोहचला त्यालाच कळाल नाही. तो स्टेशनवर पोहचला. पण आता त्याच्या कडे एकही रुपया नव्हता. गावाकडे जाण्यासाठी त्याला चारपाचशे रुपये तरी लागणार होते. त्याने रेल्वे स्टेशनजवळ असलेल्या स्थानिक दुकान दाराना विनंती केली. मी गावाकडून आलो आहे. माझी मुंबईत फसवणूक झाल्यामुळे माझ्या कडे आता एकही रुपया नाही. मला गावाकडे जाण्यासाठी तुम्ही मदत करा. मी तुम्हचे पैसे परत पाठवण्याची व्यवस्था करतो. पण सगळ्यांनी सुनिलला पैसे देण्यास नकार दिला. सुनिल रेल्वेस्टेशन वर असलेल्या बाकड्यावर जाऊन बसला. सुनिलच्या डोळयातून पाणी येत होत. तितक्यात सुनिलच लक्ष एका मुलीकडे गेल. ती मुलगी स्टेशनवर असलेल्या स्थानिक दुकानदाराकडे भिक मागत होती. तेव्हा ते दुकानदार त्या मुलींला पैसे देत होते. हे पाहून सुनिलला कळाल, या मुंबईतला एकही माणूस आपल्याला मदत म्हणून पैसे देणार नाही, त्यासाठी आपण ही भिक मागितली पाहीजेल. असा विचार सुनिल करू लागला. सुनिल रेल्वे स्टेशनवर असलेल्या टॉयलेटच्या ठिकाणी जाऊन, आपल्या अंगावरील सर्व

कपडे फाडून घेतले. खाली पडलेली मातीची धूळ आपल्या अंगाला व कपड्याला लावून घेतली. सुनिल या अनोळखी मुंबई मध्ये भिक मागण्यास सुरवात केली. सुनिलला प्रथम एका व्यक्तीने त्यांच्या हातावर एक रुपयाचा बंदा ठेवला. सुनिलला आणखी काही लोकांनी भिक म्हणून काही पैसे दिले. त्या पैश्यातुन सुनिलने संध्याकाळी नाष्टा केला. सुनील त्या रात्री आपला मुक्काम रेल्वे स्टेशनवर ठोकला. दुसऱ्या दिवशी सुनिल मुंबईत काम शोधण्यासाठी निघतो. पण सुनिलचा पोशाख व अवतार बघून, त्याला कामावर घेण्यास नकार देतात. सुनिल अनेक ठिकाणी कामासाठी प्रयत्न करतो. पण सगळीकडून त्याला कामाचा नकारच येतो. सुनिल शेवटी पुन्हा भिक मागण्यास सुरवात करतो. सुनिल आता रस्त्यावर भिक मागत फिरतो. रस्त्यावर सिंग्नल लागल्याने, अनेक गाड्या एकाच ठिकाणी थांबतात. तेव्हा अनेक भिकारी त्या गाड्यांजवळ जाऊन भिक मागण्यास सुरवात करतात. तेव्हा सुनिल देखील जातो. सुनिलने एका गाडीच्या काचेवर दोनदा वाजवल. तिसऱ्यादा वाजवत असताना, त्या गाडीच्या मालकाने काच खाली घेतली. तेव्हा तो मालक सुनिलला पाहुन, गाडीतुन खाली उतरला. अरे... तु सुनिल ना. अरे काय रे तुझी ही अवस्था. अस म्हणतच तो मालक, सुनिल जवळ जातो. सुनिलने त्याला ओळखल नव्हत. अरे सुनिल मला ओळखला नाहीस का? अरे मी उत्कर्ष. तुझा

कॉलेज मित्र. तेव्हा सुनिलने उत्कर्षला ओळखल. हा उत्कर्ष सुनिलचा कॉलेज मित्र. उत्कर्ष जेव्हा बारावीला होता, तेव्हा उत्कर्षच्या घरची परिस्थिती खूप वाईट होती. उत्कर्षला बारावी बोर्डोच्या परिक्षेची फी भरण्यासाठी त्याच्या कडे पैसे नव्हते. तेव्हा सुनिलने आपल्या घरच्यांना सांगुन उत्कर्षच्या बारावी बोर्डोची फी भरली होती. तेव्हा उत्कर्ष बारावी पराक्षेमध्ये राज्यात पहिला आला होता. तेव्हा उत्कर्षला कॉलेजकडुन पुढील शिक्षण घेण्यासाठी बाहेर पाठवल होत. त्या दिवसापासून सुनिलची व उत्कर्षची भेट झालेली नव्हती. त्यानंतर दोघांची भेट आजच झाली. तिही अश्या अवस्थेत. सुनिलचा अवतार पाहुन उत्कर्षच्या डोळयात पाणी आले. त्यांन सुनिलच काहीच न ऐकता. सुनिलला आपल्या गाडीत बसण्यास सांगितल. आपल्या ड्रायव्हरला एका हॉटेलवर गाडी थांबवण्यास सांगितल. हॉटेलवर एक रूम बुक करून, तिथे सुनिलला पहिला नविन कपडे घालण्यास दिले. सुनिल आपल सगळ आवरुन आल्यावर, दोघेजण रूम मध्ये बोलत बसले. सुनिलने गावापासून ते इथपर्यंत घडलेला सगळा प्रकार उत्कर्षला सांगितला. तेव्हा उत्कर्षच्या डोळयात पुन्हा पाणी आल. उत्कर्ष आपले डोळे पुसतच. कुणाला तरी फोन लावून अर्जेन्ट हॉटेलवर याला सांगतो. हॉटेलवर उत्कर्षचा एक मित्र आला. तो मित्र एक चित्रपटांचा मोठा डायरेक्टर होता. उत्कर्ष या डायरेक्टर

मित्राला सुनिलच्या घरच्यानी व सुनिलने त्याला केलेली मदतीपासुन ते आज त्याला भिक मागत दिसलेला सुनिल. इथपर्यंतचा सगळा प्रवास उत्कर्षने आपल्या डायरेक्टर मित्राला सांगितले. तेव्हा उत्कर्षने आपल्या डायरेक्टर मित्राला एक विनंती केली, तुझ्या येणाऱ्या पुढील चित्रपटात सुनिलला एखादा तरी रोल दे. कारण तो चित्रपटात काम करण्यासाठी मुंबईत आला होता. मुंबईत नविन असल्याने त्याची फसवणूक झाली आहे. तो आणखी मुंबईत असाच कामासाठी फिरत बसला तर त्याची आणखी फसवणूक होईल. त्यासाठी मी तुला विश्वासाने फोन करून बोलवुन घेतल आहे. तेव्हा तो डायरेक्टर मित्र पाच मिनिटं काहीच न बोलता शांत बसला. थोड्या वेळाने उत्कर्षला म्हणाला, माझा पुढील येणारा चित्रपट सध्या तरी कोणताच नाही. पण मी आता ठरवल आहे. माझा पुढचा चित्रपट लवकरच येइल. तो चित्रपट पुर्ण पणे तुझ्या या मित्राच्या जीवनावर असेल. या चित्रपटातचा मेन हिरो देखील तुझा हा मित्र सुनिलच असेल. कारण सुनिलसारखे अनेक युवक गावाकडून चित्रपटात काम मिळेल, या आशेने मुंबईसारख्या शहरात येतात. तेव्हा त्यांची फसवणूक होते. याच कारणाने अशी पुन्हा कुणाची फसवणूक होऊ नये, म्हणून माझ्या येणाऱ्या पुढील चित्रपटाची घोषणा मी आजच करत आहे. त्या चित्रपटाचा हिरो

सुनिलच असेल, आणि त्या चित्रपटाच नाव "अनोळखी मुंबई" असेल.

हे सगळ ऐकुन सुनिला व उत्कर्षला खूप आनंद होतो. ते दोघेही त्या डायरेक्टर मित्राचे आभार मानतात. सुनिल लगेच उत्कर्षचा मोबाईल घेऊन, आपल्या घरच्याना ही आनंदाची बातमी देतो.

# पक्याचं लफडं

नुकताच दहावीला पन्नास टक्के मार्क मिळवून पास झालेला, पक्याच गावातील प्रत्येक व्यक्तीकडुन कौतुक होत होत. कारण आतापर्यंत गावातील एकही मूलगी किंवा मुलगा दहावी परीक्षा उत्तीर्ण झालेला नव्हता. पक्या हा गावातील असा पहिलाच मुलगा होता, तो दहावी परिक्षा पास झाला होता. त्यामुळे पक्याच आता गावात कॉलर ताट झाल होत. त्याच बरोबर पक्याच्या घरच्यांचा ही गावात मान वाढला होता. पक्या दहावी पास झाल्यामुळे पक्याच्या वडिलांनी गावाला जेवण घातल होत. गावातील लोकांनी पक्याच गावात बँनर लावल होत. गावातील आता गावकरी पक्याकडे पत्र लिहून व वाचून घेण्यासाठी येत होते. कारण पक्या हा दहावी पास झाल्याने गावकाऱ्याच्या मते पक्या खूप हुशार आहे असं सगळ्यांना वाटत होत. पक्या गावातल्याच शाळेत शिकल्याने आपला विद्यार्थी दहावी पास झाला. याचा रेडेकर गुरुजींना ही अभिमान वाटत होता.

गावातली शाळा व गावातलेच मास्टर असल्याने गावातली सगळी पोर नववी पर्यत अभ्यास न करताच पास व्हायचे. मग पुढे

दहावी बोर्डे परिक्षेला त्यांची दांडी उडायची. त्यामुळे गावातील अनेक पोर चारचार पाच पाचदा अभ्यास करून परिक्षा द्यायचे, तरीही ते पास व्हायचे नाहीत. हे सगळ पक्यान जवळून पाहिल होत. आपल्याला ही असच चार-पाचदा परिक्षा द्यावे लागेल म्हणुन, पक्यांन दहावीच्या परिक्षेमध्ये कॉपी केली होती. त्यामुळे पक्या दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाला होता. पक्याला अभ्यास करण्यास खुप कंटाळ यांयचा. त्यामुळे त्याला आता वाटले होते, त्याची अभ्यास या प्रकरणातून कायमची सुटका झाली. पण एक दिवस सकाळ-सकाळी पक्या अजून अंथरुणात असताना. रेडेकर गुरुजी पक्याच्या घरी आले. पक्याच्या घरच्यांनी गुरुजींचा पाहुणचार केला. तेव्हा गुरुजी पक्याच्या वडिलांना म्हणाले, आपला पक्या दहावी पास झाला. आता त्याला पुढील शिक्षण घेण्यासाठी शहरात पाठवा. गुरूजी अस सांगताना, पक्याच्या वडीलानी साफ नकार दिला. तेव्हा गुरूजी म्हणाले, नुस्ता तुम्हचा पक्या दहावी पास झाल्यावर तुम्हचा गावात एवढा मान वाढला. तर उद्या तुम्हचा पक्या शहरामधून शिकून आल्यावर तुम्हचा गावात केवडा मान वाढेल. त्याचा विचार तर करा. पोरग शहरातुन शिकून आल्यामुळे गावचा विकास होईल, या कारणामुळे पुढची सरपंच की, तुम्हच्या घराण्याला मिळू शकते. सरपंच पदाच्या या आशेने का होईना, पक्याचे वडील पक्याला शहरात शिक्षणासाठी पाठवण्यास तयार

झाले. पक्याच त्याच्या वडिलासमोर काहीच चालत नव्हत. दुसऱ्या दिवशी लगेच पक्याचे वडील पक्याला घेऊन, शहरातल्या कॉलेजमध्ये पक्याच ऍडमिशन करून, त्याला हॉस्टेल वर ठेवल. पक्याच कॉलेज ही चालू झाल. पक्याच शहरातल्या मुलांन बरोबर काहींस जमत नव्हत, पण पक्याला पुढे त्यांची ही सवय झाली. पक्या कॉलेजमध्ये व शहरामध्ये रमू लागला. पक्याच्या वर्गात संजना नावाची एक मुलगी होती. ती पक्याला आवडायची. ती संजना त्या शहरातल्या पोलीस अधिकाऱ्याची एकुलती एक मुलगी होती. त्यामुळे तिच्याकडे कुणाची वाकड्या नजरेने बघणे व तिच्याशी बोलणे कुणाला परवडणार नव्हत. कॉलेजमधील एकही मुलगा तिच्याशी बोलत नव्हता. पण आम्हच्या गावाकडचा पक्या मात्र तिश्याशी कॉलेजच्या पहिल्याच दिवशी बोलण्याचा प्रयत्न केला होता. तिही त्या दिवसापासुन पक्याशी बोलत होती. ती पोलिसाची मुलगी आहे ते मात्र पक्याला माहित नव्हत. संजना पक्याशी बोलत्या म्हणुन, पक्याचा कॉलेजमध्ये ही मान वाढला होता. पुढे पक्या आणि संजना जास्तच बोलू व भेटू लागले. पक्या दिवस-रात्र संजना बरोबर व तिच्याच आवती-भोवती फिरू लागला. संजना कॉलेजमधून घरी जाऊ पर्यत ते ती झोपू पर्यंत पक्या तिच्याशी चॅटिंग करत बसायचा. ते पुढे एकमेकांच्या प्रेमात पडले. हळूहळू त्यांच प्रेम प्रकरण कॉलेजमध्ये गाजू लागल. एक दिवशी

संजना कॉलेजमधुन घरी जात होती. तेव्हा शेजारच्या कॉलेजमध्ये असलेल्या एका मुलाने संजनाला रस्त्यावर आडवून, तिला काही तरी विचारल. संजना त्या मुलाच नाव आपल्या वडिलांना सांगितल. दुसऱ्या दिवशी संजनाच्या वडीलानी त्या मुलाला दोन्ही कॉलेजच्या समोर उभा करून त्या मुलाला संजनाची माफी मागण्यास सांगितली. इथुन पुढे कोणत्याही मुलीच्या बाबती परत अस केलास तर गाठ माझ्याशी आहे. अशी समज देऊन, त्या मुलाला सोडून दिल. तेव्हा पक्याला कळल, संजना ही पोलिसाची मुलगी आहे. हे कळल्यापासुन पक्या संजनाशी काही दिवस बोलाच नाही. पुढे संजनाच कॉलेजमध्ये पक्याला म्हणली, काय झाल रे तुला, अस का? वागतोस माझ्याशी. तेव्हा पक्या संजनाला म्हणाला, तुझे बाबा पोलीस आहेत, हे मला का सांगितली नाहीस. संजना म्हणते, अरे माझे बाबा पोलीस आहेत, हे सगळ्या कॉलेजला माहीत आहे. मला वाटल, तुला देखील माहीत असेल. म्हणून सांगितलं नाही. त्या दोघांचा ही एकमेकांवरचा गैरसमज दूर होतो. ते दोघे एका ठिकाणी बसतात. तेव्हा संजना म्हणते, आता आपले पेपर जवळ येत आहे. आपण अभ्यास केला पाहिजेल. अभ्यासाच नाव निघताच, पक्याने आपल तोंड वाकड केल. संजना म्हणते, काय झाल तुला तोंड वाकड करायला. काय नाही अस म्हणून पक्या मोकळा होतो. पक्या पुढे संजनाला म्हणतो, संजना

खर सांगू तुला. मला काय येत नाही ग अभ्यासातल. मी दहावी सुद्धा कॉपी करून पास झालोय. रेडेकर गुरुजींच्या व वडिलांच्या हाटापाई मी इकडे शिकंण्यास आलो आहे. तेव्हा संजना म्हणते, अरे वेड्या मग कर ना आता इथुन. मी शिकवेन तुला. पुढे संजना व पक्या एकत्र अभ्यास करू लागले. संजनाच्या नांदाने, पक्या शिकू लागला. संजना जिथे क्लासला जाईत होती, तिथल्या सरांना संजनाने विंनती करून पक्याला क्लास मध्ये प्रवेश मिळवून दिला. पुढे दोघे क्लासला देखील एकत्र जाऊ लागले. त्यामुळे शहरात हळुहळु चर्चा रंगु लागली की, पोलिस अधिकऱ्याच्या मुलगी एका गावातल्या पोराच्या लफड्यात आहे. ही बातमी पक्याच्या गावातही पसरली. कारण पक्याच्या गावातले काही लोक शहरात कामास येत होते. परंतु ते दोघे कुणाकडे लक्ष देत नव्हते. ते शहरात बिंनधास्त फिरायचे. पुढे अकरावी बारावी दोघेही चांगल्या मार्कानी पास झाले. पक्या बारावी पास झाला म्हणुन, गावात फटाक्यांची बाजी उडवूनच पक्याच गावात स्वागत करण्यात आल. पण गावात पक्या लफड्यात हाय, ही बातमी गावातल्या लहान मुलांपासुन ते वयस्कर व्यक्तीपर्यत पसरलेली होती. पण पक्याच्या घरच्यांपर्यत गेलेली नव्हती. पक्या अधुन-मधून शहरात संजनाला भेटायला जायायचा. असच एक दिवस ते दोघे शहरात भेटण्यासाठी एकत्र आले होते, तेव्हा संजनाच्या वडीलांनी त्या दोघांना पाहिल.

संजनाच्या वडिलांनी संजनाला समजावून सांगितल, पण संजनाने वडिलांना सांगितल, माझ पक्यावर प्रेम आहे. मला त्याच्याशीच लग्न करायच आहे. पण संजनाच्या वडीलांनी नकार दिला. पुढे संजनाच्या वडीलांनी संजनाला लांब एका शहरामध्ये पुढील शिक्षण घेण्यासाठी पाठवल. पक्या मात्र त्याच शहरातल्या एका महाविद्यालया मध्ये पुढील शिक्षण घेऊ लागला. संजना पक्याला आधुन-मधून फोन करत होती. आता पक्याही झोर देऊन अभ्यास करत होता. पुढे पक्याने तीन वर्षानी डीग्री प्राप्त केली. तिकडे संजना तर महाविद्यालयात प्रथम आली होती. दोघेही पास झाल्यावर पुन्हा एकत्र आले. संजनाने आपल्या वडीलांना, पक्याबद्दल परत रिक्वेस्ट केली. पण त्यांनी परत नकारच दिला. इकडे पक्या डिग्री पास झाला म्हणुन पक्याच जंगी स्वागताची तयारी गावात चालू झाली होती. संजनाच्या वडीलांनी नकार दिल्याने, पक्या व संजनाने पळुन जाऊन लग्न केल. पक्या संजनाला घेऊन गावात आला. तेव्हा सगळे आश्चर्य चक्कीत झाले. गावातली सगळी लहान मुले, पक्या दादानं लग्न केल अशी बोंब मारत गावात सुटले. तेव्हा पक्याच्या वडीलांना व त्यांच्या घरच्यांना समजत. तर तिकडे संजनाच्या वडिलांना ही समजत. त्या अगोरच पक्यां गावतल्या पोलिस पाटलांना सगळ सागंतो. पक्याचे वडील खुप संतापतात. त्यानी फोटोच्या मागे ठेवलेली तलवार काढून दोघांना ही,

संपवण्याची भाषा करू लागतात. तेवड्यात गावचे पोलिस पाटील, पक्या-संजना व गावचे सर्व लोक, पक्याच्या दारी गोळा होतात. तेव्हा पक्याचे वडील म्हणतात, माझ गावा पुढे नाक कापलास. तु इथुन चालता हो. तितक्यात पोलिस पाटील पक्याच्या वडीलांना म्हणतात, तुम्ही खुप नशिबवान आहात. कारण तुम्हचा मुलगा व तुम्हची सुन खुप शिकलेली मिळाल्यात. तुम्हची सुन तर महाविद्यालयात प्रथम आलेली मुलगी आहे. त्याच बरोबर ती एक पोलिस अधिकाऱ्याची मुलगी देखील आहे. तुम्हची सुन वडीलांच्या विरोधात जाऊन तुम्हच्या मुलाशी लग्न केली आहे. तुम्ही तिला वडिलांच प्रेम दिल पाहिजे. सर्व गावकरी ही, पक्याच्या वडीलांना सांगितल, त्यां दोघांचा तुम्ही स्विकार केला पाहिजे. गावकऱ्याच्या विंनतीला मान देऊन पक्याच्या वडीलांनी, पक्याचा व संजनाचा सुन म्हणुन स्विकार केला. तितक्यात गावात अचानक पोलिसाच्या तीन-चार गाड्या आल्या. सर्व जण त्याच्याकडे पाहत होत. पक्या व सजंना मात्र आता खुप घाबरले होते. त्या एका गाडीतुन पोलिस अधिकारी खाली उतरले. ते डायरेक्ट पक्याच्या वडीलांन जवळ जाऊन थांबले. संपुर्ण गाव त्या पोलिस अधिकाऱ्यांकडे पाहत होत. तितक्यात त्या पोलिस अधिकाऱ्यांने पक्याच्या वडीलांसमोर हात जोडून म्हणाले, माझ्या मुलीचा व्यवस्थित सांभाळ करा. अस म्हणाताच पक्याच्या वडीलांनी

पोलिस अधिकाऱ्याला मिठी मारली. पक्या व संजना आंनदी झाले. एकुलती एक मुलगी असल्याने सजंनाच्या वडीलांनी पक्याला जावाई म्हणून स्विकारल. पुन्हा गावात पक्याचा व पक्याच्या घरच्यांचा मान सन्मान वाढला.

**ई साहित्य प्रतिष्ठानचं तेरावं वर्ष.**

**प्रतिक उकले यांचं ई साहित्यवर हे पहिलंच पुस्तक.**

प्रतिक एक विद्यार्थी आणि साहित्याचा प्रेमी. वाचन करता करता त्याला लेखनाची आवड निर्माण झाली. त्याचं लेखन हे भवतालच्या अनुभवातून निर्माण झालेललं अस्सल वास्तव आहे. आणि त्यामुळे वाचकांना ते ओरिजिनल चवीचा आनंद देते. त्यांचा हा पहिलाच कथा संग्रह आहे आणि तो गाजणार, लोकांना आवडणार यात शंका नाही.

लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं कितीही चांगली असली तरी विकली जात नाहीत. त्यामुळे त्यांना प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी ‘‘मृत्युंजय’’कार शिवाजी सावंत यांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. या दुष्टचक्रातन अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

आता नेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम

ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्याची ई साहित्यची इच्छा आहे. नवीन उत्कृष्ट लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनुप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले,

अंबरीश गुरव, अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे, राजेंद्र शेळके, पुर्वा राउत, धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर, बाळासाहेब शिंपी, प्रतिक उकले असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

मराठीत हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे, आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com